कृषीवल
रायगड, रविवार, दि. २९ मार्च २०२६
किंमत ४₹

## चुलता-पुतण्यांमध्ये जीवघेणा हल्ला

**महाड :** तालुक्यातील कुसगाव खुर्द येथे कौटुंबिक वादातून आणि किरकोळ कारणावरून चुलता आणि पुतण्यांमध्ये भीषण हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या वादाचे रूपांतर खुनी हल्ल्यात झाले असून, दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जीवघेणे वार करण्यात आले आहेत. या प्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन्ही गटांविरुद्ध गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, बाळाराम तुकाराम किर्वे (६१) हे कुसगाव येथे नवीन घर बांधत आहेत. मात्र, त्यांच्या या नवीन घर बांधण्याचा राग मनात धरून त्यांचे पुतणे अंकुश रामचंद्र किर्वे आणि विलास पान २ वर

## आ. महेश बालदी 'जुमलेबाज'

### राष्ट्रवादीचे अस्लम लियाकत यांचा आरोप

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदारांना आकर्षित करण्यासाठी दिलेली आश्वासने प्रत्यक्षात पूर्ण होत नसल्याचा आरोप उरणमध्ये पुन्हा एकदा पुढे आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उरण विधानसभा उपाध्यक्ष अस्लम लियाकत कल्याणकर यांनी भाजप आमदार महेश बालदी यांच्यावर 'जुमलेबाजी' केल्याचा घणाघाती आरोप केला आहे.



कल्याणकर यांनी सांगितले की, निवडणुकीपूर्वी सुमारे सात ते आठ हजार महिलांकडून शिलाई मशीन व घरघंटी देण्याच्या नावाखाली अर्ज भरून घेण्यात आले होते. स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देत महिलांना प्रलोभन दाखवण्यात आले. मात्र, निवडणूक पार पडून अनेक महिने उलटूनही महिलांना अद्याप कोणतीही साधने मिळालेली नाहीत, त्यामुळे ही केवळ निवडणुकीपुरती 'जुमलेबाजी' असल्याचे स्पष्ट होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, शिलाई मशीन व घरघंटी मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या महिलांनी वारंवार आमदारांच्या पान २ वर

**महिलांना शिलाई मशीन, घरघंटीचे आश्वासन हवेतच?**

## पुन्हा याल तर याद राखा.., ग्रामस्थांचा सज्जड इशारा

# अधिकाऱ्यांना पळवले

### तिसरी मुंबईसाठी उरणमध्ये ड्रोनद्वारे जमिनीचे सर्वेक्षण

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

तिसरी मुंबईच्या ड्रोन सर्वेक्षणासाठी रस्तोरस्ती रंगाच्या आधारे प्लॅटफॉर्म उभारणाऱ्या कर्मचाऱ्यांना गावकऱ्यांनी हुसकावून लावले असल्याची सनसनाटी घटना समोर आली आहे. सारडे गावातील रस्त्यांवर अशा प्रकारचे काळे पिवळे पट्टे मारण्यासाठी आलेल्या संबंधित कंपनीच्या कर्मचाऱ्यांना गावकऱ्यांनी पिटाळून लावले असून, पुन्हा या भागात याल तर परिणाम वाईट होतील, असा सज्जड दमदेखील दिला आहे.



उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ महसुली गावांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने के.एस.सी. नवनगर नावाने तिसरी मुंबई उभारण्याच्या जोरदार हालचाली सुरू आहेत. या प्रकल्पाच्या निमित्ताने बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारने फसवी साडेबावीस टक्क्यांची योजना जाहीर केली आहे. मात्र, आधीच्या सिडको आणि नवी मुंबईच्या विकसित भूखंड देण्याच्या अत्यंत वाईट अनुभवाच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी सरकारने दाखविलेले हे गाजर यापूर्वीच धुडकावून लावलेले आहे. मुंबईपासून अगदी ३५ मिनिटांवर असलेल्या उरणच्या कोणत्याही पान २ वर

**संतापाचे वातावरण**

केएससी टाऊनसाठी जीआयएस आधारित विद्यमान भू-वापर आराखडा तयार करण्याकरिता मेसर्स टेककॉम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट्स अँड सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ड्रोन सर्व्हेसाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे काळे-पिवळे आकाराचे पट्टे गावोगावी मारायला सुरूवात केली आहे.

## वेधक

### विवाहितेचा छळ

**पनवेल :** शारीरिक, मानसिक आणि आर्थिक छळ करून क्रूर वागणूक दिल्याप्रकरणी विवाहितेने तिचा पती, सासू-सासरे आणि पतीची मैत्रीण यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पोलिसांनी या चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ४१ वर्षीय पीडित महिला तळोजा येथे राहात असून, त्यांना दोन मुले आहेत. २००९ मध्ये त्यांचे लग्न उत्तर प्रदेश येथे झाले. त्यानंतर माहेरहून काही हुंडा आणला नाही, असे बोलून तुझ्या आई-वडिलांकडून पैसे घेऊन ये, अन्यथा तुमचा घटस्फोट करेन, अशी धमकी दिली. मात्र, पीडितेने पान २ वर

### शॉर्ट सर्किटमुळे घराला भीषण आग

**सुधागड-पाली :** माणगाव बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील वडाचामाल (धनगरवाडा) येथे शॉर्ट सर्किटमुळे घराला लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. गंगुबाई धोंडू बोडेकर आणि धोंडू बाळू बोडेकर यांच्या घराला अचानक आग लागून घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. माहितीनुसार, अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांतच उग्र रूप धारण केले. आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र आगीची पान २ वर

## महिन्यानंतरही युद्धविराम नाहीच!

- इराण-इस्त्रायलमधील संघर्ष टोकाला
- जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धाला एक महिना पूर्ण झाला असला तरी संघर्ष आणखी तीव्र होत असल्याचे चित्र समोर येत आहे. दरम्यान, दोन्ही बाजूंनी हल्ल्यांची तीव्रता वाढवली असून, मध्यपूर्वेतील तणाव जागतिक संकटात परिवर्तित होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

इस्रायलने इराणमधील अत्यंत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या अणू केंद्रांवर हवाई हल्ले केल्याने परिस्थिती अधिक चिघळली. या



हल्ल्यामुळे इराणच्या अण्वस्त्र क्षमतेला मोठा धक्का बसल्याचा दावा केला जात असला तरी किरणोत्सर्गाचा धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त होत आहे.

इराणने या कारवाईला ''मानवतेविरुद्धचा गुन्हा'' ठरवत कठोर प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला होता. त्याच पार्श्वभूमीवर इराण समर्थक गटांनी सौदी अरेबियातील अमेरिकेच्या 'प्रिन्स सुल्तान एअर बेस'वर क्षेपणास्त्र हल्ला चढवला. या हल्ल्यात हवेत इंधन भरणारी तीन विमाने उद्ध्वस्त झाल्याचे वृत्त असून, अनेक अमेरिकन सैनिक जखमी झाले आहेत. पान २ वर

## ट्रक कलंडला; चालक जखमी

### चोळईतील तीव्र वळणाचा उतार ठरतोय धोकादायक

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील चोळईतील तीव्र वळणाचा उतार गेल्या अनेक वर्षांपासून महामार्ग रुंदीकरणापूर्वीही धोकादायक ठरलेला असून, शनिवारी दुपारी याच वळणावर शीतपेयांचा ट्रक कलंडल्याने चालक जखमी झाला आहे.



(छायाचित्र : शैलेश पालकर)

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या पान २ वर









# पेशवाई रस्ता झाला सुसाट

## • वाहनचालकांचे हाल थांबले

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ गावाला वळसा घालून बाहेर पडण्यासाठी ओळखला जाणारा पेशवाई रस्ता अनेक वर्षे दुरवस्थेमुळे वाहतुकीसाठी बंदच होता. मात्र, आता या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू झाल्याने पुन्हा एकदा या मार्गावर वाहनांची वर्दळ वाढू लागली आहे. रस्त्याच्या दुरुस्तीचे काम वेगाने सुरु असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



आंबिवली-माणगाव येथील रेल्वे फाटक ते बोरले या दरम्यान गेल्या चार महिन्यांपासून सुरू असलेल्या कामामुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळत आहे.

कर्जत-नेरळ-कल्याण आणि माथेरान-नेरळ-कळंब या राज्य मार्गांच्या मध्यवर्ती ठिकाणी नेरळ गाव असल्याने सर्व वाहतूक गावातूनच होत होती. पर्यायी रस्ते खराब अवस्थेत असल्यामुळे पाडा गावातील रेल्वे फाटकाजवळ नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत होती. त्यामुळे नेरळ गाव वाहतुकीचे प्रमुख केंद्र बनले होते.

ही समस्या लक्षात घेऊन कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी पेशवाई रस्त्याचे मजबुतीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आंबिवली-माणगाव रेल्वे फाटकापासून बोरले गावापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण हाती घेण्यात आले असून, मागील वर्षी या कामाचा शुभारंभ करण्यात आला होता.

सध्या या रस्त्यावर काँक्रिटचा पहिला थर टाकण्यात आला आहे. त्यामुळे पूर्वी असलेले मोठे खड्डे नाहीसे झाले असून, वाहनांची ये-जा सुरळीत सुरू झाली आहे. नेरळ गावात काम नसलेली अनेक वाहने आता थेट या पर्यायी मार्गाचा वापर करत साई मंदिरपर्यंत पोहोचत आहेत. अद्याप रस्त्याचे पूर्ण काम झाले नसले तरी अर्धवट कामानंतरही वाहनचालकांना मोठा दिलासा मिळत आहे.

काँक्रिटचा एक थर टाकल्यानंतरच वाहनांची गती वाढली असून, या मार्गाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. याशिवाय, माणगाव-आंबिवली फाटक ते कल्याण-कर्जत मार्ग जोडणारा रस्ताही मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे हा संपूर्ण पर्यायी मार्ग विकसित होत असून नेरळमधील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे.

गेल्या २५ वर्षांपासून या रस्त्यावर केवळ तात्पुरती खड्डे भरण्याची कामे होत होती. मात्र, आता पूर्ण काँक्रिटीकरण होत असल्याने अनेक वर्षांची समस्या मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. यामुळे वाहनचालक आणि नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहेत.

## झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

**पनवेल** : पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वावंजे गावात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आला आहे. सदर अनोळखी मयत पुरुषाचे वय ४५ ते ५० वर्ष असून याने १० ते १५ दिवसापूर्वी पंचाच्या साह्याने अशीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली होती. बुधाजी नारायण माळी याची सर्व नो ११६/अ, नाझ इंडस्ट्रीज च्या जवळ वावंजे तालुका पनवेल जिल्हा रायगड या ठिकाणी हा मृतदेह आढळून आला. सदर इसमाने अंगात नाइकचा काळ्या रंगाचा हाफ बाहांचा टी शर्ट, निळ्या रंगाचा बर्मुडा, काळ्या रंगाची कॅप, पायात तपकिरी व काळे पट्टे असलेली चप्पल घातलेली आहे. अनोळखी मयत पुरुष वय ४५ ते ५० वर्ष याने १० ते १५ दिवसापूर्वी पंचाच्या साह्याने अशीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत असून, याबाबत कोणाला माहिती असल्यास संपर्क साधावा.

## गोमांसची तस्करी करणाऱ्या आरोपींवर कारवाई

। पनवेल । प्रतिनिधी ।

गोवंश जातीचे मांस मुंबई येथे विक्रीकरीता घेऊन जात असल्याची माहिती मिळाल्याने यातील अटक दोन आरोपींना गोमांस असलेल्या झायलो कार क. एम.एच. ०४ डी. वाय. २४२१ सह ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. या घटनेबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्यावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

नमूद गुन्ह्याचे तपासात यातील अटक आरोपी यासीन मोईनुद्दीन शेख (३७), पासु उस्मान कुरेशी (४५), मोहंमद अली अकबर अली शाह (३०) यांचेकडे केलेल्या तपासात सदर गोवंश जातीच्या ४ बैलांची कत्तल करून आणलेले मांस हे म्हाप्रळ,येथुन आरोपी गुलामगौस नसरूद्दीन मुकादम, (३७) याच्याकडून आणले असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता टोळीप्रमुख अटक आरोपी यासीन मोईनुद्दीन शेख याने इतर साथीदारांसह एकत्रितरित्या व संघटीतपणे दहशत दाखवून हिंसेचा व इतर बेकायदेशीर कृत्यांचा वापर करून सदर बेकायदेशीर कृत्य सतत चालू ठेवलेबाबत त्यांचेवर इतर पोलीस ठाणे येथे देखील गुन्हे दाखल असल्याबाबत उघडकीस आले.

नमूद गुन्ह्यातील अटक आरोपींनी हिंसाचाराचा वापर करून, धाकदपटशा करून व संघटीतपणे जबरदस्ती करून अवैध मार्गाने परिसरात दहशत माजवुन वर्चस्व निर्माण करण्याकरिता कृत्य केल्याचे दिसून आल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाउसाहेब ढोले हे करीत आहेत.

## ‘बेक’मधील कंत्राटी कामगारांना कायम दर्जा



। रोहा । प्रतिनिधी ।

कामगारांच्या हितासाठी झटणाऱ्या जनरल मजदूर सभा या संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बेक केमिकल्स कंपनीतील १८ कंत्राटी कामगारांना कायम कामगारांचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे.

जनरल मजदूर सभा व कंपनी व्यवस्थापन यांच्यात झालेल्या करारानुसार या कामगारांना टप्प्या-टप्प्याने कायम सेवेत सामावून घेण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी ६ कामगारांना कंपनीने स्वतःच्या रोलवर कायम कामगार म्हणून नियुक्त केले होते. नुकतेच आणखी ६ कामगारांना कायम कामगारांचा दर्जा देऊन त्यांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे. संबंधित कामगारांना अधिकृत पत्रांचे वितरण करण्यात आले.

ही पत्रे जनरल मजदूर सभेचे सरचिटणीससंजयवढावकर,अध्यक्षा संज्योतवढावकर,उपाध्यक्षशामकांत जोशी यांच्या हस्ते कामगारांना प्रदान करण्यात आली. यावेळी कंपनीतर्फे साईट हेड डायरेक्टर समीर पवार, सिनिअर मॅनेजर एच आर गजानन बामणे, असिस्टंट मॅनेजर शैलेश निंबरे, युनियनचे सचिव जगदीश उपाध्ये, खजिनदार प्रशांत शेट्ये, रायगड संपर्क प्रमुख सुहास खरीवले उपस्थित होते.

या निर्णयामुळे कंत्राटी कामगारांमध्ये समाधान व्यक्त केले असून, जनरल मजदूर सभेच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी बेक कमेटी अध्यक्ष संजय शेळके, राजेश बानुगडे, विजय जाधव, सतीश चावरेकर, संदिप रटाटे व कामगार उपस्थित होते.

## कळंबोलीत अमली पदार्थांची विक्री

। पनवेल । प्रतिनिधी ।

कळंबोलीमध्ये अमली पदार्थाचे सेवन व विक्री होत असल्याबद्दल प्रभाग आठच्या नगरसेविका बायजा बबन बारगजे यांच्यावतीने कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी बबन बारगजे, माणिकराव पवार, बाळासाहेब जगताप, महेंद्र खबाले, वैभव फाळके, कृष्णा गर्जे, दिलीप गर्जे, सचिन मुळीक उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळात भेट दिल्यानंतर राजेंद्र कोते यांनी सांगितले की, आमची ही कारवाई चालूच आहे व नागरिकांनीसुद्धा यामध्ये संशयित व्यक्तींची नावे व ठिकाण आमच्या पोलीस प्रशासनास कळवावेत, आम्ही योग्य ती कारवाई करू, असे आश्वासन दिले.

## बिबट्याचा धुमाकूळ सुरूच

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यात बिबट्याच्या वाढत्या हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अधिक तीव्र झाले आहे. जावेळे गावात घडलेल्या घटनेनंतर अवघ्या २४ तासांतच शेजारील वडशेत वावे येथे पुन्हा बिबट्याने हल्ला करत लोकवस्तीत घुसखोरी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास बस स्थानकाजवळील परिसरात घडलेल्या या घटनेत एका वासराचा बळी गेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बिबट्याने थेट गावातील मध्यवर्ती भागात प्रवेश करत पाळीव जनावरांवर झडप घातली. या हल्ल्यात तीन वासरे जखमी झाली असून त्यापैकी एका वासराचा जागीच मृत्यू झाला. उर्वरित दोन वासरे ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे वाचली.



या सलग घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. ‘‘आज जनावरांवर हल्ला झाला, उद्या माणसांवर होईल का?’’ असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दिवसाढवळ्याही बाहेर पडताना भीती वाटत असल्याचे अनेकांनी सांगितले. ग्रामस्थांच्या मते, बिबट्याच्या वावराबाबत यापूर्वीही वनविभागाला वारंवार माहिती देण्यात आली होती. मात्र, ठोस उपाययोजना न झाल्याने आता परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचा आरोप केला जात आहे.

घटनेनंतर वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून पंचनामा करून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. सरपंच मनोहर सावंत यांच्यासह ग्रामस्थांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. तरीही ‘‘घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत?’’ असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान,ग्रामस्थांनीप्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचा इशारा दिला आहे. बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावणे, २४ तास गस्त ठेवणे, लोकवस्तीत देखरेख वाढवणे, नुकसानग्रस्तांना तातडीने भरपाई देणे आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणे या मागण्या करण्यात आल्या आहेत.

### वडशेत वावेत वासराचा बळी

अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

या घटनांमुळे गावातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. लहान मुलांना घराबाहेर पाठवणे थांबले असून रात्रीची वर्दळ पूर्णपणे बंद झाली आहे. शेतात जाणे धोकादायक ठरत असून महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये विशेष भीतीचे वातावरण आहे.

दरम्यान, नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रात्री बाहेर पडणे टाळावे, टॉर्चशिवाय बाहेर जाऊ नये, एकटे फिरणे टाळावे, लहान मुलांवर लक्ष ठेवावे आणि संशयास्पद हालचाली त्वरित प्रशासनाला कळवाव्यात, असे सांगण्यात आले आहे. सलग घडलेल्या या घटनांमुळे श्रीवर्धन तालुका हादरला असून बिबट्याचा वाढता वावर आणि प्रशासनाची संथ प्रतिक्रिया यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. आता परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलण्याची मागणी होत आहे.

पान १ वरून

## आ. महेश बालदी ‘जुमलेबाज’

कार्यालयाशी संपर्क साधला असता, समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार आहे. यामुळे संबंधित महिलांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, आश्वासनांबाबत आता शंका व्यक्त केली जात आहे. याबाबत आमदार महेश बालदी यांनी लवकरच वस्तूंचे वाटप करण्यात येईल, असे आश्वासन दिले असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात यासाठी अजून किती प्रतीक्षा करावी लागणार, असा सवाल महिलांकडून उपस्थित केला जात आहे.

## अधिकाऱ्यांना पळवले

शेतकऱ्याला सरकारची साडेबावीस टक्क्यांची योजना अजिबात मान्य नाही. त्याचबरोबर आधीचा अनुभव पाहता साडेबावीस टक्के सांगितले जात असले तरीही प्रत्यक्षात शेतकऱ्यांना केवळ पावणेसोळा टक्के भूखंड मिळत आहेत. हे भूखंड मिळविण्यासाठीदेखील शेतकऱ्यांकडून लाखो रुपयांचे विविध प्रकारचे शुल्क आकारले जात आहेत. हा आकडा एका गुंठ्यामागे लाखो रुपयांच्या घरात जात असल्याने शेतकऱ्यांना ही साडेबावीस टक्क्यांची योजनाच मान्य नाही. तशा प्रकारची निवेदनेदेखील येथील केएससी नवनगर विरोधी शेतकरी संघर्ष समितीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींना दिली आहेत. असे असतानाच आत्ता सरकारच्यावतीने ड्रोनद्वारे जमिनीचा सर्व्हे करण्याची तयारी सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने केएससी टाऊनसाठी जीआयएस आधारित विद्यमान भू-वापर आराखडा तयार करण्याकरिता मेसर्स टेककॉम अर्बन मॅनेजमेंट कन्सल्टंट्स अँड सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ड्रोन सर्व्हेसाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे काळे-पिवळे आकाराचे पट्टे गावोगावी मारायला सुरूवात केली आहे. आधीच शेतकऱ्यांच्या विरोधाची सरकारकडून फारशी दखलही घेतली नाही. असे असतानाच गावोगावच्या रस्त्यांवर स्थानिक कोणत्याच प्राधिकरणाची साधी परवानगी न घेता या पट्टे मारण्याच्या कृतीला गावकरी जोरदार विरोध करीत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून असे ड्रोन सर्व्हेच्या निमित्ताने गावकुसाबाहेर रस्त्यांवर काळे-पिवळे पट्टे मारायला येणाऱ्या या कर्मचाऱ्यांना आता संतप्त शेतकऱ्यांकडून हुसकावून लावण्याचा काम केले जात आहे.

सारडे येथील शेतकऱ्यांनी या कर्मचाऱ्यांना हुसकावून लावताना पुन्हा या भागात दिसलात तर परिणाम वाईट होतील, असा सज्जड दमही दिला आहे. गोवठणे गावातदेखील अशाच प्रकाराचे पट्टे मारण्यात आले होते. येथील गावकऱ्यांनी सरकारच्या कृतीचा निषेध व्यक्त केला आहे. तिसरी मुंबईविरोधात येथील २५ हजार शेतकऱ्यांनी आपल्या हरकती नोंदवल्या आहेत, त्या हरकतींवर साधी सुनावणीदेखील न घेता सरकारने हा प्रकल्प या ठिकाणी लादण्याचा अट्टाहास चालविला आहे. त्या या अनुषंगाने शेतकऱ्यांनी आता गावोगावी ड्रोन सर्व्हेसाठी पट्टे मारायला येणाऱ्या कर्मचाऱ्यांना पिटाळून लावले आहे. चिरनेर गावातही गावकऱ्यांनी या सर्व्हे कर्मचाऱ्यांना पिटाळून लावले आहे.

## ट्रक कलंडला; चालक जखमी

रूंदीकरणावेळी धोकादायक वळणे तसेच तीव्र वळणाचा उतार कमी करून चौपदरीकरण न झाल्याने चोळईतील तीव्र वळणाचा उतार रूंदीकरणापूर्वीपासून गेली अनेक वर्षे धोकादायक ठरत आहे. चोळईतील तीव्र उतारावर रिक्षेतील विद्यार्थिनींचा अपघात, आ. योगेश कदम यांचा अपघात तसेच अनेक अपघात सातत्याने होत आहेत. शनिवारी, दुपारी रत्नागिरी येथून मुंबईच्या दिशेने शीतपेयांच्या बाटल्यांचे पॅकिंग घेऊन निघालेल्या ट्रक (क्र. एमएच ४६ सीक्यू ५१८६) कशेडी घाटरस्त्यावरील चोळईतील तीव्र वळणाचा उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने कलंडला. यामुळे झालेल्या अपघातामध्ये ट्रकचालक जखमी झाला. चालकाला तातडीने पोलादपूर ग्रामीण रूग्णलयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती समजताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सतीश पवार आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. या अपघातप्रकरणी पोलादपूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## चुलता-पुतण्यांमध्ये जीवघेणा हल्ला

रामचंद्र किर्वे यांनी २६ मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास बाळाराम यांच्यावर हल्ला केला. अंकुश आणि विलास या दोघांनीही बाळाराम यांच्या डोक्यात कशाने तरी गंभीर प्रहार करून त्यांना जखमी केल्याने त्यांना माणगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी पुणे येथे हलविण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींना ताब्यात घेतले आहे.

दुसऱ्या तक्रारीत पुतण्या अंकुश किर्वे याने दिलेल्या फिर्यादीनुसार, चुलते बाळाराम किर्वे यांनी दारूच्या नशेत जेवण चांगले झाले नाही या कारणावरून वाद घातला. बाळाराम यांनी अंकुश यांच्या पत्नीचा गळा दाबला. पत्नीला सोडवण्यासाठी अंकुश गेले असता, बाळाराम यांनी त्यांच्या मान आणि हातावर वस्तऱ्याने वार करून त्यांना जखमी केले. याप्रकरणी बाळाराम किर्वे यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला असून, ते जखमी असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अधिक तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गोरेगावकर करत आहेत.

## शॉर्ट सर्किटमुळे घराला भीषण आग

तीव्रता जास्त असल्याने मोठे नुकसान टाळता आले नाही. या आगीत घरातील धान्यसाठा, कपडे, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच दैनंदिन वापरातील आवश्यक वस्तू पूर्णतः जळून खाक झाल्या आहेत. त्यामुळे बोडेकर कुटुंबीयांवर मोठे आर्थिक संकट कोसळले असून, ते अक्षरशः उघड्यावर आले आहेत. घटनेची माहिती मिळताच माणगाव बुद्रुक ग्रामपंचायतीचे सरपंच रमेश साळुंखे, ग्राम महसूल अधिकारी शिरीष तांबट तसेच महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल भंडारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अधिकाऱ्यांनी तातडीने पंचनामा करून नुकसानाचा आढावा घेतला आणि कुटुंबियांना धीर दिला. दरम्यान, या घटनेनंतर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्याची आणि पुनर्वसनाची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

## विवाहितेचा छळ

माहेरून काही आणले नाही म्हणून सासू-सासरे तिला शिवीगाळ आणि मारहाण करून छळ करू लागले. तर, तिच्या पतीच्या मैत्रिणीने त्याला भडकवून पीडितेला मारहाण करायला लावायची. त्याच्या या जाचाला कंटाळून या विवाहितेने याप्रकरणी तळोजा पोलिसांत तक्रार दिली आहे.

## महिन्यानंतरही युद्धविराम नाहीच!

या हल्ल्यामुळे अमेरिकेसाठी थेट आव्हान उभे राहिले असून, सौदी अरेबियालाही या संघर्षात सक्रिय भूमिका घ्यावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, इस्रायलने तेहरानमधील महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करत तेहरान विद्यापीठ परिसरावरही हल्ला केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे संघर्ष अधिकच तीव्र आणि व्यापक बनत आहे. आखाती देशांमध्येही तणाव वाढत असून संयुक्त अरब अमिराती, बहरीन, कुवेत आणि सौदी अरेबियामध्ये क्षेपणास्त्र व ड्रोन हल्ले सुरूच आहेत.

या युद्धाचे परिणाम आता जागतिक स्तरावर जाणवू लागले आहेत. मध्यपूर्वेतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होत असून आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढू लागल्या आहेत. परिणामी पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी गॅसच्या दरात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे अनेक देशांमध्ये एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होण्याची भीती आहे. भारतासारख्या आयात-आधारित देशांवर याचा थेट परिणाम होऊ शकतो. घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढणे, इंधन महाग होणे आणि वाहतूक खर्च वाढल्याने महागाईचा भडका उडण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे.

## कारचालकाने पोलीस चौकीचे केले नुकसान

। पनवेल । प्रतिनिधी ।

पोलिसांना धक्काबुक्की करून चौकीच्या आवारातील कुंड्या, प्लास्टिकच्या खुर्चा तसेच चौकीचा काचेचा दरवाजा तोडून नुकसान केल्याप्रकरणी कारचालक शेरबहादूर याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय जाधव हे पनवेल वाहतूक शाखेत पोलीस हवालदार असून, ते गस्त करत असताना एका कारला त्यांनी हात दाखवून थांबण्याचा इशारा केला. मात्र चालकाने कार जाधव यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी त्याला कोनगाव येथील चौकीच्या आवारात आणले असता त्याने चौकीसमोरील झाडांच्या कुंड्या, प्लास्टिकच्या खुर्च्या तसेच चौकीचा काचेचा दरवाजा तोडून नुकसान केले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## कळंबोलीत आधुनिक शैक्षणिक संकुल उभारा

### • नगरसेवक रामदास शेवाळे यांची महापौरांकडे मागणी

। पनवेल । प्रतिनिधी ।

कळंबोली सेक्टर-२०, भूखंड क्र. १८ येथील राखीव जागेवर अत्याधुनिक शैक्षणिक संकुल उभारण्याबाबत कळंबोलीचे नगरसेवक रामदास शेवाळे यांनी पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्यादके मागणीचे निवेदन सादर केले.

या निवेदनामध्ये शेवाळे यांनी या परिसरातील वाढती लोकसंख्या आणि अपुऱ्या शैक्षणिक सुविधांमुळे विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला आहे. त्यामुळे येथील राखीव भूखंडाचा योग्य वापर करून आधुनिक सुविधा असलेले शैक्षणिक संकुल उभारणे गरजेचे असल्याचे शेवाळे यांनी या निवेदनात नमूद केले आहे. या संकुलामध्ये डिजिटल क्लासरूम, सुसज्ज ग्रंथालय, क्रीडा सुविधा तसेच इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे सभापती बबन मुकादम, सहकारी महेश गोडसे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## लाखोंच्या लोखंडी सळ्यांचा अपहार

। पनवेल । प्रतिनिधी ।

चार लाख ६२ हजार रुपये किमतीच्या ७ हजार किलो वजनाच्या लोखंडी सळ्यांचा अपहार केल्याप्रकरणी चालक प्रवीण कुमार याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

किरण ढवळे हे ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये मॅनेजर म्हणून नोकरी करतात. ८ मार्च ते ९ मार्च दरम्यान ट्रक ट्रेलरमध्ये ३१ लाख ४ हजार रुपये किमतीच्या लोखंडी सळ्या भरून चालक प्रवीण कुमार हा गोदरेज हिल, कल्याण येथे खाली करण्यासाठी निघाला. हा ट्रक ट्रेलर हा प्रवीण कुमार याने पनवेल येथील गॅरेज शिरढोण येथील कंपाऊंडमध्ये उभा केला आणि दोन ते तीन दिवस येणार नाही असे सांगितले. त्यानंतर चालकाला फोन केला असता प्रत्येक वेळी त्याने खोटे कारण सांगितले आणि फोन स्विच ऑफ येऊ लागला.

त्यानंतर कल्याण येथील ज्या ठिकाणी माल द्यायचा होता त्या ठिकाणच्या मालकाने फोन करून माल पाठवा असे सांगितले. यावेळी हा ट्रक मालासह दुसऱ्या चालकाने त्या ठिकाणी जाऊन वजन केले असता ट्रकमधील वजन ७ हजार किलो कमी असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे.



## अंजुमनच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

। मुरुड । प्रतिनिधी ।

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड येथे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात उत्साहात पार पडला.

या निरोप समारंभ कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष जैनुद्दीन कादरी, प्रा. डॉ. साजिद शेख, सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जैनुद्दीन कादरी यांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत उत्तम नागरिक बनून समाजसेवा करण्याचा संदेश दिला. प्रा.डॉ. साजिद शेख यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच पदवी पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले आणि उच्च शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयेशा आरिफ, इफ्फा करबारी, बाजिला कादरी आणि मुस्कान मांडलेकर यांनी केले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक श्री. सुर्यकांत शंकर नागवेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**

**मौजे-कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| सर्व्हे नं./हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रु-पै |
|---|---|---|
| ५९/१/२/११ | ४०६ | ४०-६० |
| ५९/१/२/१२ | २७६ | २७-६० |
| ५९/१/२/१३ | २८२ | २८-२० |
| ५९/१/२/१६ | ३५८ | ३५-८० |
| ५९/१/२/१७ | २७६ | २७-६० |
| ५९/१/२/१८ | २८२ | २८-२० |

आणि वर नमूद सर्व्हे नं. ५९/१/२/११ या मिळकतीवर बांधलेले घर क्षेत्र ९५.१ चौरस मिटर कारपेट, ज्याचे ग्रुप ग्रामपंचायत कोल्हारे मालमत्ता क्र. १७४९ असा आहे.

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ‘‘लक्ष्मी सदन’’, जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

**स्वतःच्या दुखापेक्षा समाजाचे दुःख मोठे आहे, हे ओळखून आपले सारे जीवन तमाम शेतकरी, कष्टकरी, कामगारांसाठी समर्पित करणाऱ्या, कौटूंबिक नाते, जिव्हाळ्याचे व ऋणानुबंधाचे संबंध जपणाऱ्या, राजकीय, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात भक्कम पकड असणाऱ्या, प्रेमळ स्वभावाबरोबरच स्पष्टवक्त्या म्हणून त्यांची एक वेगळी ख्याती होती. गोरगरीब, पिडीत, महिला, कष्टकऱ्यांच्या हितासाठी लढा देणाऱ्या, शेतकऱ्यांचे कैवारी स्व. नारायण नागू पाटील यांचा वारसा जपणाऱ्या माजी राज्यमंत्री, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, अभ्यासू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या स्व. मीनाक्षी पाटील अर्थात सर्वांच्या ताई या रायगडच्या नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्राच्या झुंजार नेत्या होत्या. त्यांनी सारे आयुष्य शेवटच्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी घालविले. २९ मार्च २०२४ मध्ये त्यांचे दिर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांना त्रिवार अभिवादन. स्व. मीनाक्षी ताईंच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या घेतलेल्या कार्याचा आढावा...**

# महाराष्ट्राच्या झुंजार नेत्या



प्रमोद जाधव

शेतकऱ्यांनासावकाराच्यागुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ज्यांच्या नेतृत्वाखाली चरी येथे शेतकऱ्यांनी संप पुकारला. ते झुंजार नेते, शेतकऱ्यांचे कैवारी स्व. नारायण नागू पाटील यांच्याकडून समाजसेवेचा वारसा स्व. मीनाक्षी पाटील अर्थात ताईंनी घेतला. शाहू, फुले, आंबेडकरांचे पुरोगामी विचार घराघरात पोहचवून मनमानी करणाऱ्या सरकारला झुकविणाऱ्या अशा मीनाक्षीताई होत्या. विधिमंडळात अभ्यास पुर्ण भाषण करून पिडीत, दलित, गोरगरीबांचे आवाज बनण्याचे काम त्यांनी प्रामाणिकपणे केले.

गोरगरीबांना केंद्र बिंदू ठेवून काम करणाऱ्या ताई प्रत्येकांच्या गळ्यातील एक ताईत होत्या. माणुस म्हणून जगणाऱ्या सर्वांची विचारपूस करून मायेची सावली बनणाऱ्या ताई होत्या. जिल्हा परिषदेसह विधिमंडळातील सभागृहातील त्यांचे अभ्यासपुर्ण वकृत्व कायमच आजही प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या कर्तृत्वाची आठवण राजकीय पटलावर आल्याशिवाय कधीच राहत नाही. राजकारणात एक मुर्तीमंत उदाहरण म्हणून त्या कायमच रायगडकरांसाठी प्रिय आहेत. शेकाप सातत्याने विरोधात राहूनही आपले आमदार असलेल्या मतदारसंघात जास्तीत जास्त निधी आणण्यात यशस्वी ठरला आहे. यामागे त्यांनी सातत्याने केलेला सरकार दरबारी पाठपुरावा व अधिकारी, मंत्र्यांवर ठेवलेला दबाब यामुळे शक्य झाले. यात मीनाक्षीताईंनी आमदार झाल्यापासून आघाडी घेतली आहे. ताई पहिल्यांदा आमदार झाल्या त्यावेळी अलिबागला विकासाची आस लागली होती. रस्ते, दिवे, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, आंग्रे समाधीचे सुशोभिकरण, हिराकोट तलावाची साफसफाई ही कामे हाती घेऊन अलिबागचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात केली. त्यामुळे अलिबागच्या अनेक भागात रस्ते उभारणीला ताईंनी प्राधान्य दिले. विकासकामे करण्याचा त्यांनी सपाटा लावला होता. अलिबाग, श्रीबाग येथे एम.आय.डी.सी.चा पाणीपुरवठा सुरु केला. अलिबागला जोडून असलेल्या चेंढरे गावातही पाणी योजना आणण्यात ताई यशस्वी ठरल्या. त्यावेळी नगरपालिकांच्या शेजारी असलेल्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी सरकारी योजना जाहीर झाली होती. त्यातील पहिली योजना चेंढरे गावात आणण्यात त्यांनी यश मिळविले. अलिबाग-मुरुड हा त्यांचा मतदारसंघ टँकरमुक्त करण्याचे त्यांनी ठरविले आणि ते शक्य करून दाखविले. मीनाक्षीताई बंदर व खारभूमी विकास राज्यमंत्री झाल्या. हे खाते कोकणाच्यादृष्टीने अतिशय महत्वाचे होते. मच्छिमारांचे या भागातील प्रश्न जाणून घेऊन ते सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या काळात पावले उचलली. करंजा, सातपाटी, मिळकतखार या ठिकाणी लँडिंग सेंटर सुरु केल्याने त्याची कोळी बांधवांना मोठी मदत झाली. वेंगुर्ला हे बंदर स्वातंत्र्यानंतर दुर्लक्षित झाले होते. आपल्या मंत्रीपदाच्या काळात त्यांनी या बंदरातील गाळ काढून जलवाहतुकीला प्राधान्य दिले. मांडवा बंदर म्हणून विकसित केले. निवटी येथे मच्छिमारांसाठी जेट्टी उभारली. स्थानिक कोळी समाजाच्या बाजूने ठामपणे उभ्या राहून त्यांच्या बाजूने मीनाक्षीताईंनी आवाज उठविला. त्यांच्या या धोरणाला अनेकांचा विरोध झाला होता. मात्र, त्या विरोधाला त्यांनी काही जुमानले नाही. अलिबाग हे पर्यटनाचे मुख्य केंद्र म्हणून विकसित व्हावे. त्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार निर्मिती व्हावी यासाठी ताईंनी अनेक योजना आखल्या आणि पूर्णत्वास नेल्या. खारलँडसाठी विशेष निधी मंजूर करून घेण्यात त्या यशस्वी झाल्या.

शेतकरी, कष्टकरी, कामगारांचा आवाज बनण्याचे काम मीनाक्षीताईंनी त्यांच्या हयातीमध्ये प्रामाणिकपणे केले आहे. रायगडच्या नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्राच्या त्या झुंजार नेत्या होत्या. स्वतःच्या दुखापेक्षा समाजाचे दुःख मोठे आहे, हे ताईंनी ओळखून आपले सारे जीवन तमाम शेतकरी, कामगारांसाठी समर्पित केले आहे. राजकारणात अनेक वेळेला मत मतांतर असू शकतात. परंतु, वैयक्तिक जीवनाच्या सुख दुःखाशी समरस कसे व्हावे. कौटूंबिक नाते, जिव्हाळ्याचे व ऋणानुबंधाचे संबंध कशा पद्धतीने जपावे, याचा आदर्श प्रत्येकाने घ्यावा, अशा ताई होत्या. ज्या वेळेला महिला राजकारणात सक्रीय नव्हत्या, त्या काळात मिनाक्षीताई पाटील राजकारणात होत्या. आपल्या वकृत्वाच्या जोरावर राजकारणात त्यांनी एक वेगळी पक्कड निर्माण केली. पक्ष वाढीबरोबरच अलिबागच्या व रायगडच्या विकासामध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

बंदर व खारभूमी विकास राज्यमंत्री म्हणून त्यांनी खंबीरपणे जबाबदारी सांभाळली. मांडवा बंदराच्या विकासामध्ये मीनाक्षी ताईंचे योगदान हे मोलाचे आहे. येथील कोळी समाजासह इतर समाजाचा विकास करण्यावर त्यांनी कायमच भर दिला आहे. वेळ प्रसंगी सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी रुद्र रुप धारण करून प्रशासन व शासनाला झुकविण्याचे काम ताईंनी खंबीरपणे केले आहे. मीनाक्षीताईंचा मंत्रालयात एक वेगळा दबदबा होता. अभ्यासपुर्ण भाषणाने त्यांनी अधिवेशनही अनेकवेळा गाजवले आहे. ताईंनी एखादा प्रश्न हाती घेतला. तो मार्गी लावल्याशिवाय त्या कधीच मागे सरकल्या नाही. जनतेच्या हिताची अनेक कामे त्यांनी केली आहेत. सर्वसामान्यांसाठी झटणारी रणरागिणी अशी त्यांची एक ओळख संपुर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली होती. ताई खऱ्याअर्थाने शेतकऱ्यांचा अधार होत्या. शेवटच्या घटकाच्या व्यथा सोडविण्याचे काम ताईनी सक्षमपणे केले. प्रेमळ स्वभावाबरोबरच स्पष्टवक्त्या म्हणून त्यांची एक वेगळी ख्याती होती. त्यांची आठवण ही कायमच स्मरणात राहणारी आहे.

ताईंना कोटी कोटी प्रणाम. ••

---

## निवडक




### आंतरराष्ट्रीय भाषेत पुस्तकाचे प्रकाशन

**रायगड :** अलिबागमधील वैद्यकिय क्षेत्रातील प्रसिद्ध डॉ. अशिष भगत आणि सातारा येथील डॉ. श्वेता बागडे यांनी लिहिलेल्या तब्बल सात आंतरराष्ट्रीय भाषेमध्ये निर्मिती केलेल्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच अलिबागमध्ये पार पाडला. अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशनच्यावतीने आयोजित 'आम्माकॉन २०२६' या कार्यक्रमात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील यांच्या हस्ते इन्स्ट्रुमेंट्स इंटेंडेड फॉर द क्यूअर ऑफ सर्जिकल डिसिस या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदशन मिळाव, या उद्देशाने अलिबाग येथीलल को. ई.स. चंद्रकांत हरी केळुस्कर महाविद्यालयाचे प्राचार्य, होमिओपॅथिक तज्ज्ञ व होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात सर्जरी विषयाचे प्राध्यापक डॉ. आशिष अशोक भगत आणि सातारा येथील सावकार होमिओपॅथीक महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. श्वेता बागडे यांनी 'इन्स्ट्रुमेंट्स इंटेंडेड फॉर द क्यूअर ऑफ सर्जिकल डिसिस' या पुस्तकाची निर्मिती केली आहे.



### जीव धोक्यात घालून खरेदी

**पनवेल :** नवीन पनवेल परिसरातील मध्य कोकण रेल्वे मार्गालगत आठवडा बाजार भरवला जात आहे. परंतु, हा बाजार नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना रेल्वे रूळ ओलांडून जावे लागत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग आणि लहान मुलांसह अनेक कुटुंबे जीव धोक्यात घालून या बाजारात येत आहेत.या गंभीर परिस्थितीकडे अद्याप कोणत्याही प्रशासनाचे लक्ष गेले नसल्याचे दिसून येत आहे. बाजारात व्यवसाय करणारे अनेक विक्रेते हे नवी मुंबईच्या बाहेरील भागातून येत असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळते. त्यामुळे या बाजाराच्या नियोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. दरम्यान, आठवडा बाजारात भाज्या, फळे व इतर जीवनावश्यक वस्तू तुलनेने स्वस्त दरात मिळत असल्याने सर्वसामान्य नागरिकांसाठी हा बाजार महत्त्वाचा ठरतो. वाढत्या महागाईमुळे आर्थिकदृष्ट्या हतबल झालेल्या कुटुंबांसाठी हा बाजार एक दिलासा ठरत आहे. मात्र, स्वस्त दराच्या मोहापायी नागरिक स्वतःचा जीव धोक्यात घालत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. भविष्यात कोणतीही मोठी दुर्घटना घडू नये यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### भटक्या कुत्र्यांचे होणार निर्बीजीकरण

**रायगड :** अलिबाग शहरात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. अनेकवेळा पादचारी व दुचाकी चालकांवर हे कुत्रे हल्ला करतात. अलिबाग नगरपरिषदेने शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी पुढाकार घेतला आहे. शहरामध्ये कुत्र्यांच्या निर्बीजीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी निर्बीजीकरण केंद्राचा लोकार्पण सोहळा सोमवारी (दि.३०) अलिबाग समुद्रकिनारी असलेल्या मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये होणार आहे. हा कार्यक्रम सकाळी १०.०० वाजता असणार आहे. त्यानंतर अलिबाग नगरपरिषदेच्या आवारात शववाहिका वाहन आणि सेप्टीक टाकी मैला उपसा वाहनाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक आदी मान्यवरांसह नगरसेवक, मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.



---

# अरविंद म्हात्रे यांचा पाहणी दौरा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



पनवेल महानगरपालिका प्रभागातील नागरिक विविध समस्यांनी ग्रासलेले आहेत. त्यात स्मशानभूमी, सांडपाणी वाहिनी तसेच विभागातील रस्ते अशा अनेक गंभीर समस्या आहेत. यादरम्यान, पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी प्रभाग क्रमांक १, २ आणि ३ मधील नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचे निरसण करण्यासाठी पाहणी दौरा केला. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत सुचना देखील केल्या.

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेत अरविंद म्हात्रे यांनी पाहणी दौऱ्याची सुरूवात तळोजा येथून केली. या दौऱ्यामध्ये त्यांनी पेठगाव येथील जीर्ण झालेली पाण्याची टाकी दुरुस्त करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानंतर त्यांनी खारघर सेक्टर ३६ येथे नव्याने सुरू झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या दवाखान्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी या दवाखान्यामध्ये डायलेसिसची सुविधा, एक्स-रे मशीन, डॉक्टरांची संख्या वाढवणे याबाबत महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. गोसावी यांना सूचना केली. पुढे त्यांनी रोहिंजन येथील जीर्ण झालेल्या स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याची सूचना अधिकाऱ्यांना केली. त्यानंतर घोट येथीलल घनकचरा विभागाला भेट दिली. येथील कचरा रात्रीच्या वेळेस जाळण्यात येतो. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना विचारणा केली आणि हा प्रकारा बंद करण्याच्या सुचना केल्या. पुढे पाले खुर्द या गावाला भेट देत असताना येथील जीर्ण झालेली स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. त्याचवेळी देवीचा पाड या ठिकाणी येथील आशा वर्करने अरविंद म्हात्रे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अरविंद म्हात्रे यांना आपल्या मानधनाबाबत निवेदन दिले. यावेळी

**■ संबंधित अधिकाऱ्यांना केल्या सूचना**

अरविंद मात्रे यांनी, आपण याबाबत पनवेल महानगरपालिकेच्या आयुक्तांशी चर्चा करू आणि हा विषय पालिकेच्या मासिक सभेमध्ये घेऊन याबाबत तोडगा काढू, असे आश्वासन दिले.

यावेळी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांच्यासह महानगरपालिका चिटणीस तथा नगरसेवक प्रकाश म्हात्रे, नगरसेवक राम पाटील, नगरसेवक हरीश केणी, नगरसेवक तुषार पाटील, नगरसेविका प्रगती कैलास पाटील, नगरसेविका लीला कातकरी, नगरसेविका योगिता फडके, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, प्रभाग अधिकारी अरविंद म्हात्रे, आणि पालिकेचे विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

---



# उरणमध्ये गॅस पुरवठा विस्कळीत

**। उरण । प्रतिनिधी ।**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धपरिस्थितीचा परिणाम भारताच्या इंधन पुरवठा साखळीवर होत असून, त्याचा थेट फटका घरगुती गॅस सिलिंडर वितरणावर बसला आहे. त्यामुळे उरण तालुक्यात मागील काही दिवसांपासून गॅस वितरणात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, सध्या परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासन आणि गॅस वितरण कंपन्यांकडून प्रयत्न सुरू असून, वितरण हळूहळू सुरळीत होत असल्याची माहिती समोर आली आहे.

उरणमध्ये सध्या घरगुती गॅस सिलिंडरचे वितरण शासकीय नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. ग्राहकांना प्राधान्याने सिलिंडर उपलब्ध करून दिले जात असल्याने नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळत आहे. गेल्या काही दिवसांत काही ठिकाणी सिलिंडर उशिरा मिळणे, तर काही ठिकाणी वितरणात विलंब होणे अशा तक्रारी समोर आल्या होत्या. मात्र, आता परिस्थिती सुधारत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, वितरण कंपन्यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

---



**अलिबाग-बेलकडे मार्ग**

# रस्त्यावरील खोदकामाचा रुग्णवाहिकेला फटका

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

एमएसआयडीसी मार्फत अलिबाग ते सहाण बायपासपर्यंत काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. त्यासाठी ठिकठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. त्यामुळे पंधरा ते वीस मिनीटांचे अंतर कापण्यासाठी एक तास लागत आहे. त्याचा फटका प्रवाशांसह रुग्णवाहिकेलादेखील मोठ्या प्रमाणात बसत आहे. त्यामुळे ठेकेदारांच्या मनमानी कारभाराबाबत तीव्र नाराजीचे सुर उमटत आहेत.

विकासाच्या नावाखाली अलिबाग-बेलकडे मार्गावरली काही ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे तोडण्यात आली. रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यासाठी जेसीबीच्या माध्यामतून खोदकाम करण्यात आले. परंतु, या कामांत योग्य नियोजन नसल्याने धुळ खात प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. विद्यार्थी, कामगारांना तासानसात वाहतूक कोंडीत अडकण्याची वेळ आली आहे. रुग्णांना घेऊन रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णवाहिकेलादेखील या वाहतूक कोंडीशी सामना करावा लागत आहे. तसेच, माती, खडीतून वाहन चालविताना अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. ठेकेदारांकडून कोणत्याही प्रकारचे नियोजन नसल्याची प्रतिक्रीया प्रवासी वर्गाकडून उमटत आहे.

---

# सचिन पावशे यांना पितृशोक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमधील पत्रकार सचिन पावशे यांचे वडील गौऱ्या विठ्ठल पावशे यांचे शुक्रवारी (दि.२७) वृद्धपकाळाने निधन झाले. निधनासमयी ते ८७ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा मोठा मुलगा संदीप पावशे हे अलिबाग को. ऑपरेटिव्ह बँकमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. गौऱ्या पावशे हे अलिबाग तालुक्यातील नवेदर नवगाव येथील मच्छिमार सोसायटीचे माजी चेअरमन होते. तसेच, ते शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत व शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे विश्वासू कार्यकर्ते होते. गौऱ्या पावशे यांचे उत्तरकार्य मंगळवार दि.७ एप्रिल रोजी त्यांच्या राहत्या घरी सकाळी ९.०० वाजता होणार असल्याची माहिती पावशे कुटूंबियांकडून देण्यात आली आहे.



---

# भीमाशंकर अभयारण्यातून तरुणाची सुटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

भीमाशंकरच्या अभयारण्यातून मुंबईतील तरूणाची सुखरूप सुटका करण्यात यश आले आहे. येथील पायवाटांमुळे त्याचा गोंधळ उडाला आणि भरकटला. तसेच, त्याचा मोबाईलही बंद पडला. त्यामुळे त्याच्या शेवटच्या लोकशेनवरून या तरूणाचा शोध घेण्यात यश मिळाले.

मूळचा ओडिशा राज्यातील असलेला श्रीकांत साहू हा तरुण मुंबईमधील दादर भागात नोकरी निमित्त राहतो. हा तरुण भीमाशंकर येथील भगवान शंकराच्या मंदिरात जाण्यासाठी घरातून निघाला. भीमाशंकर अभयारण्यातून यापूर्वी देखील या तरूणाने प्रवास केला होता. त्यामुळे तो सकाळी खांडस गावातून भीमाशंकर अभयारण्य मधून जाण्यास निघाला. सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास त्या तरुणाने ऐनकर यांच्याशी संपर्क साधून आपण रस्ता चुकलो आहोत, अशी माहिती दिली. त्यानंतर खांडस गावातील निवृत्ती ऐनकर यांनी येथील सामाजिक कार्यकर्त्यांना संपर्क केला. त्यातून खोपोली येथील हेल्प फाऊंडेशनकडून गुरुनाथ साठलेकर यांच्याशी निवृत्ती ऐनकर यांच्याशी संपर्क करून देण्यात आला.



भीमाशंकर अभयारण्यात भरकटलेल्या श्रीकांत साहू या तरुणाने आपले शेवटचे लोकेशन ऐनकर यांना पाठवले होते. त्या लोकेशननुसार हेल्प फाऊंडेशनकडून मार्गदर्शन घेऊन निवृत्ती ऐनकर तसेच खांडस गावातील रवी ऐनकर, खांडस परिसरातील तेजश वाघमारे, प्रदीप वाघमारे, सोमनाथ गोसावी यांनी जंगलात जाण्याचा निर्णय घेतला. दुपारी १.०० वाजता खांडस येथून भिमाशंकर घाट चढण्यास सुरुवात केल्यानंतर अर्धा डोंगर चढून गेल्यावर खांडस भागातील तरुणांना बैलघाट भागात काही अंतरावर पडून राहिलेला दिसून आला. त्यावेळी डोंगर उतरवून घरंगळत आल्याने श्रीकांत साहू या ट्रेकर्सच्या अंगावर काही जखमा झाल्या होत्या.त्यानंतर या ग्रामस्थांनी श्रीकांत साहू याला संध्याकाळी ४.०० वाजता खांडस येथे सुखरूप आणले.

---

**नवीन पालवी निसर्गप्रेमींसाठी आकर्षण | झाडांना विविध रंगांचा साज**

# माथेरानच्या जंगलात वसंतोत्सव

**। नेरळ । संतोष पेरणे ।**

माथेरान हे डोंगरावर वसलेले गाव असून या ठिकाणच्या जंगलातील झाडे हि वर्षभर वेगवेगळा अनुभव देत असतात. प्रामुख्याने वसंत ऋतूमध्ये फुटणारी नवीन पालवी निसर्गप्रेमींसाठी आकर्षणाचा विषय असते. त्यामुळे वेगेवेगळ्या रंगांची छाया माथेरानच्या डोंगरात अनुभवता येते. सध्या माथेरानच्या जंगलामध्ये वसंतोत्सव फुलला असून या जंगलातील झाडे विविध रंगांनी फुललेली दिसून येत आहे.



वसंत पंचमीपासून वसंत ऋतला सुरुवात झाली आहे. त्यामुळे निसर्ग मुक्तहस्ताने रंगांची उधळण करताना दिसत आहे. या ऋतुत पळस फुलतो, काटेसावर बहरतो आणि रानमोगऱ्याची फुले निसर्गाच्या शृंगारात भर टाकत असतात. हा निसर्गाचा रंगोत्सव जवळपास महिनाभर अनुभवायाला मिळतो. निसर्गात अनेक ठिकाणी आपण फुलांच्या वेगवेगळ्या रंगछटा, त्याचे वैभव पाहत असतो. सध्या असेच काहीसे दृश्य माथेरान आणि त्याच्या अवतीभवतीच्या निसर्गात गेल्या काही दिवसांपासून नजरेस पडते आहे. निसर्गाचा वरदहस्त लाभलेले, निसर्गवैभवाची मुक्तहस्ताने उधळण झालेले, जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असणाऱ्या माथेरानच्या डोंगर आणि शिवारामध्ये काटेसावर, रानमोगरा आदी पुष्पवैभव दिमाखात नजरेस पडतात. त्याचबरोबर अनेक वृक्ष ही आपल्या पूर्ण-फुलांनी आपला अवतार बदलू पाहतात. येथील वृक्षांनी आपले रूपडं पूर्णतः पालटून घेतलेले दिसते आहे. हिरव्या गच्च असणाऱ्या झाडांमधून कोवळी पालवी धारण करून रंगीबिरंगी छटा दिवसागणिक नजरेस पडत आहेत. आज पानझड, उद्या गुलाबी कोवळी पाने, परवा गडद लाल पाने तर पुढे एकेक दिवस आणखी रंग बदलून पुन्हा आपल्या हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करत पाने आपली पूर्वावस्था धारण करतात. हा प्रवास निसर्ग प्रेमींसाठी पर्वणी आणि नजरेस सुखावणारा ठरतो.

**निसर्गाची किमया**

माथेरानच्या डोंगर आणि त्याच्या अवतीभवतीच्या अनेक वृक्षांनी आलटून-पालटून आपले रुपडे बदललेले दिसत आहे. सुरुवातीला येथील झाडांची पानगळ झाली आणि त्यामुळे निसर्गात अगदी नैराश्य निर्माण झाले होते. मात्र, थोड्याच दिवसात पुन्हा त्या झाडाला नवी पालवी निर्माण झाली. त्यामुळे निसर्गामध्ये पुन्हा नवचैतन्य निर्माण झाले आहे. अशा या रंगोत्सवात महिनाभर रंग खेळणारा निसर्ग आज माथेरानच्या अवतीभोवती दिसून येत आहे. अशी हि निसर्गाची किमया अनुभविण्यासाठी निसर्गप्रेमी व पर्यटक माथेरानला आवर्जुन भेट देत आहेत.

प्रामुख्याने माथेरान घाटात नात्याने जाताना देखील सहज नजरेस पडेल असा निसर्ग न्याहाळता येत आहे.नेरळ-माथेरान घाटात रस्त्याच्या कडेला, बागेत पिवळ्या झुपक्याचा बहावा दिसतो. तर, कुठे जांभळ्या रंगाच्या कागदी फुलांचा ताम्हण लक्ष वेढून घेत आहे. तसेच पांगारा, काटेसावर, विविधरंगी बोगनवेल अशी विविध प्रकारची फुलझाडे बहरतात, तेव्हा अवचित आपले लक्ष वेधून घेतात. मात्र, माथेरानच्या डोंगर कुशीत, त्यांच्या अंगाखांद्यावर फुलांच्या बरोबरच अनेक झाडांच्या पानांनी रंग भरलेला दिसून येत आहे.

RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक १०(२)] मंगळवार, फेब्रुवारी १७, २०२६/माघ २८, शके १९४७ [पृष्ठे ११ , किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक १५

**प्राधिकृत प्रकाशन**

**उप विभागीय अधिकारी, रोहा, उप विभाग रोहा यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ रोहा/कात-२/भूसं./पाली पाटणूस मार्ग/एसआर क्र. ०१/२०२६/२०२६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक एसआयए-२०२५/प्र.क्र.२२२/भूसंपादन-२, दिनांक ७ जानेवारी, २०२६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झअ) अन्वये एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी रायगड हे समुचित शासन आहे. त्याअर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते त्याचे सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

ज्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ४३ उप-कलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर अधिनियमाच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.





परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल;

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई करण्यात येणार नाही.

तसेच सदर अधिनियमाच्या कलम ११ चे उप-कलम (५) अनुसार भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्ययावतीकरणाचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर अधिनियमाच्या कलम ३ उप-कलम (छ) अन्वये जिल्हाधिकारी रायगड हे समुचित शासन असल्याने उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रोहा उप विभाग रोहा, ता. रोहा यांस प्राधिकृत करण्यात आले आहे.

**परिशिष्ट १**

**गावाचे नाव पाली, ता. सुधागड, जि. रायगड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ३४/१ | ०.१७.९० | ०.०५.०० |
| २ | ३४/३ | ०.५२.१० | ०.२४.४० |
| ३ | ३४/४ | ०.५०.६० | ०.१३.८५ |
| ४ | ३४/५ | ०.४३.८० | ०.१३.५० |
| ५ | ३४/६ | ०.४२.५० | ०.०३.१० |
| ६ | ४०/१ | १.२७.५० | ०.१७.०० |
| ७ | ४०/अ/प्लॉट नं १ | ०.०२.३६ | ०.०१.४० |
| ८ | ४०/अ/प्लॉट नं २ | ०.०१.६९ | ०.०१.६९ |
| ९ | ४०/अ/प्लॉट नं ३ | ०.०१.८६ | ०.०१.३६ |
| १० | ४०/अ/प्लॉट नं ४ | ०.०१.९६ | ०.०१.९६ |
| ११ | ४०/अ/प्लॉट नं ५ | ०.०१.६१ | ०.०१.६१ |
| १२ | ४०/अ/प्लॉट नं ६ | ०.०१.८० | ०.०१.८० |
| १३ | ४०/अ/प्लॉट नं ७ | ०.०१.९७ | ०.०१.४० |
| १४ | ४०/अ/प्लॉट नं ८ | ०.०१.५७ | ०.०१.०० |
| १५ | ४०/अ/प्लॉट नं ९ | ०.०१.५६ | ०.०१.०० |
| १६ | ४०/अ/प्लॉट नं १० | ०.०१.७८ | ०.००.९० |
| १७ | ४१/३ | ०.४१.७० | ०.०८.२० |
| १८ | ४१/४ | ०.३१.९० | ०.०७.५० |
| १९ | ४१/५ | ०.०५.१० | ०.०३.०० |
| २० | ४१/६ | ०.२१.५० | ०.१३.०० |
| २१ | ५५/३ | ०.२७.६० | ०.१०.७५ |
| २२ | ५५/४ | ०.१९.५० | ०.०४.७५ |
| २३ | ५५/५ | ०.२४.५० | ०.१६.४० |
| २४ | ५६/१ | ०.४७.८० | ०.५.७५ |
| २५ | ५६/२ | ०.६४.५० | ०.११.३० |
| २६ | ६३/१ | ०.४२.७० | ०.२५.०० |
| २७ | ६३/३ | ०.०४.५० | ०.०१.६० |
| २८ | ६५/प्लॉट/१७ | ०.०३.८३ | ०.०२.४० |
| २९ | ६५/प्लॉट/१८ | ०.०५.१३ | ०.०५.१३ |
| ३० | ६५/प्लॉट/२२ | ०.०४.६८ | ०.०३.६८ |
| ३१ | ६५/प्लॉट/२३ | ०.०५.१२ | ०.०५.१२ |
| ३२ | ६५/प्लॉट/२४ | ०.०२.७२ | ०.०२.७२ |
| ३३ | ६५/प्लॉट/२५ | ०.०३.०२ | ०.०२.०० |
| ३४ | ६५/रस्ता | - | ०.०६.७० |
| ३५ | ६५/खुले क्षेत्र | - | ०.०४.७० |
| ३६ | ६६/२ | ०.८९.६० | ०.२९.०० |
| ३७ | ६७/१ | ०.३०.१० | ०.०१.०० |
| ३८ | ६८/२ | ०.३५.७० | ०.१९.६० |
| ३९ | ६९/२ | ०.४५.०० | ०.०३.५० |
| ४० | ६९/३ | ०.४७.८० | ०.२८.८० |
| ४१ | ९५/३ | ०.८२.०० | ०.०४.०० |
| ४२ | ९६/२ | ०.६२.७० | ०.२५.४५ |
| ४३ | ९७/१ | ०.४१.५० | ०.००.२० |
| ४४ | ९७/२ | ०.४५.५० | ०.२१.९० |
| ४५ | ९७/४ | ०.२९.३० | ०.०१.७० |
| ४६ | ९८/१ | ०.८८.०० | ०.२६.८० |
| ४७ | ९८/२ | ०.५७.७० | ०.००.९० |
| ४८ | १००/७ | ०.२५.०० | ०.०३.५० |
| ४९ | १००/८ | ०.०२.०० | ०.०२.०० |
| ५० | १००/९ | ०.०४.०० | ०.०२.२० |
| ५१ | १००/१० | ०.११.०० | ०.०५.०० |
| ५२ | १०१/१ | ०.३०.१० | ०.१८.८० |
| ५३ | १०३/१ | ०.८५.७० | ०.०७.२५ |
| ५४ | १०३/२ | ०.७७.१० | ०.१४.४० |
| ५५ | १०३/३ | ०.५९.४० | ०.२२.६० |
| ५६ | १०३/४ | ०.०९.५० | ०.०४.७० |
| ५७ | १०४/१ | १.८२.२० | ०.१४.२० |
| ५८. | १०४/२ | ०.३७.४० | ०.१२.५० |
| ५९ | १०५/३ | ०.८४.५० | ०.२२.७० |
| ६० | १४४/३ | ०.८४.५० | ०.२५.९० |
| ६१ | १४५ | १.६७.०० | ०.००.२० |
| ६२ | १५१ | ०.५२.६० | ०.०७.४० |
| ६३ | १५२/७/अ | ०.५६.०० | ०.०८.०० |
| ६४ | १५२/७/ब | ०.०५.०० | ०.००.८० |
| ६५ | १५२/८ | १.१७.०० | ०.१५.५० |
| | | **एकूण** | **५.८१.१७** |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नाव :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता भूसंपादनाचा प्रस्ताव.

**प्रकल्पाचे विवरण :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील मौजे पाली ५-८१-१७ हे.आर क्षेत्राचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा.५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील मौजे पाली या गावांतील जमिनीचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा.५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० या प्रयोजनासाठी संपादित करण्यात येत असून सदर प्रकल्पामुळे रहदारीसाठी रस्ता होऊन पाली शहरातील वाहतूक कोंडी दूर होणार असून नागरिकांना पर्यायी रस्ता उपलब्ध होणार आहे.

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :- निरंक**

**परिशिष्ट ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा : महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग ४-अ, दि. ७ जानेवारी २०२६/ पौष १७, शके १९४७ अन्वये भूमी संपादन, पूनर्वसन व पूनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट दिली आहे.

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण :- निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टीप.**—प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

रोहा,
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२६.

**ज्ञानेश्वर खुटवड,**
सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, रोहा,
उप विभाग रोहा.

**उप विभागीय अधिकारी, रोहा, उप विभाग रोहा यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ रोहा/कात-२/भूसं./पाली पाटणूस मार्ग/एसआर क्र. ०२/२०२६/२०२६.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक एसआयए-२०२५/प्र.क्र.२२२/भूसंपादन-२, दिनांक ७ जानेवारी, २०२६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झअ) अन्वये एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

पान ५ वर

पान ४ वरून

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार **जिल्हाधिकारी रायगड** हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते त्याचे सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ४३ उप-कलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर अधिनियमाच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल;

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई करण्यात येणार नाही.

तसेच सदर अधिनियमाच्या कलम ११ चे उप-कलम (५) अनुसार भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्ययावतीकरणाचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर अधिनियमाच्या कलम ३ उप-कलम (छ) अन्वये जिल्हाधिकारी रायगड हे समुचित शासन असल्याने उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रोहा उप विभाग रोहा, ता. रोहा यांस प्राधिकृत करण्यात आले आहे.

भाग एक (को.वि.पु.)-१५–२

६ **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी, फेब्रुवारी १७, २०२६/माघ २८, शके १९४७**

**परिशिष्ट १**

**गावाचे नाव बुरमाळी, ता. सुधागड, जि. रायगड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ७/१ अ, ब | ०.५०.६० | ०.०३.८० |
| २ | ९/१ | ०.३३.१० | ०.१८.५० |
| ३ | ९/२ | ०.२६.३० | ०.०७.७० |
| ४ | १०/१ | ०.८४.०० | ०.१३.०० |
| ५ | १०/२ | ०.४५.५० | ०.०९.९० |
| ६ | ११/१ | ०.२६.०० | ०.०९.६० |
| **एकूण** | | | **०.६२.५०** |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नाव :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता भूसंपादनाचा प्रस्ताव.

**प्रकल्पाचे विवरण :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील मौजे बुरमाळी ०-६२-५० हे.आर., क्षेत्राचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील मौजे बुरमाळी या गावांतील जमिनीचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० या प्रयोजनासाठी संपादित करण्यात येत असून सदर प्रकल्पामुळे रहदारीसाठी रस्ता होऊन लोकांना ये- जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण : निरंक**

**परिशिष्ट ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा : महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग ४-अ दि. ७ जानेवारी २०२६/ पौष १७, शके १९४७ अन्वये भूमी संपादन, पूनर्वसन व पूनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट दिली आहे.

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण : निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टीप.**—प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

रोहा,
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२६.

**ज्ञानेश्वर खुटवड,**
सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, रोहा,
उप विभाग रोहा.

## उप विभागीय अधिकारी, रोहा, उप विभाग रोहा यांजकडून

**अधिसूचना**

**भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक उविअ रोहा/कात-२/भूसं./ पाली पाटणूस मार्ग/एसआर क्र.०३/२०२६/ २०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक एसआयए-२०२५/प्र.क्र.२२२/भूसंपादन-२, दिनांक ७ जानेवारी, २०२६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झअ) अन्वये एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार **जिल्हाधिकारी रायगड** हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते त्याचे सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

ज्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ४३ उप-कलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर अधिनियमाच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल;

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई करण्यात येणार नाही.

तसेच सदर अधिनियमाच्या कलम ११ चे उप-कलम (५) अनुसार भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे कलम १०, उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्ययावतीकरणाचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर अधिनियमाच्या कलम ३, उप-कलम (छ) अन्वये जिल्हाधिकारी रायगड हे समुचित शासन असल्याने उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रोहा उप विभाग रोहा, ता. रोहा यांस प्राधिकृत करण्यात आले आहे.

भाग एक (को.वि.पु.)-१५–२अ

**परिशिष्ट १**

**गावाचे नाव : बलाप, ता. सुधागड, जि. रायगड**

| अ.क्र. | स.नं./ग.नं. | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ३२/ २ | ०.२३.३० | ०.०८.४० |
| २ | ३३ | ०.२९.८० | ०.०१.२० |
| ३ | ३७/ २/ ब | ०.३९.०० | ०.०६.७५ |
| ४ | ३७/ ४ | ०.१५.४० | ०.०२.८५ |
| ५ | ३७/ ५ | ०.१३.१० | ०.०६.१० |
| ६ | ३७/ ६ | ०.२४.३० | ०.०६.५० |
| ७ | ३८/ १ | ०.३१.९० | ०.०८.९० |
| ८ | ३८/ ४ | ०.२०.७० | ०.१२.५० |
| ९ | ३८/ ५ | ०.१२.१० | ०.०४.५० |
| **एकूण** | | | **०.५७.७०** |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नाव :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी.०/०० ते ३/०० करीता भूसंपादनाचा प्रस्ताव.

**प्रकल्पाचे विवरण :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील मौजे बलाप ०-५७-७० हे.आर. क्षेत्राचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा.५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे :** रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील मौजे बलाप या गावांतील जमिनीचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० या प्रयोजनासाठी संपादित करण्यात येत असून सदर प्रकल्पामुळे रहदारीसाठी रस्ता होऊन लोकांना ये-जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :– निरंक**

**परिशिष्ट ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा : महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग ४-अ, दि. ७ जानेवारी २०२६/ पौष १७, शके १९४७ अन्वये भूमी संपादन, पूनर्वसन व पूनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट दिली आहे.

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण :– निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टीप.**—प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

रोहा,
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२६.

**ज्ञानेश्वर खुटवड,**
सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, रोहा,
उप विभाग रोहा.

## उप विभागीय अधिकारी, रोहा, उप विभाग रोहा यांजकडून

**अधिसूचना**

**भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्र. उविअ रोहा/कात-२/भूसं./ पाली पाटणूस मार्ग/एसआर क्र. ०४/२०२६/२०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक एसआयए-२०२५/प्र.क्र.२२२/भूसंपादन-२, दिनांक ७ जानेवारी, २०२६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झअ) अन्वये एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीच्या संपादनाबाबत सदर जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार जिल्हाधिकारी रायगड हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते त्याचे सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

ज्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटुंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ४३ उप-कलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ११ च्या उप-कलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सदर अधिनियमाच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतर करविणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देऊ शकेल;

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई करण्यात येणार नाही.

तसेच सदर अधिनियमाच्या कलम ११ चे उप-कलम (५) अनुसार भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्ययावतीकरणाचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर अधिनियमाच्या कलम ३ उप-कलम (छ) अन्वये जिल्हाधिकारी रायगड हे समुचित शासन असल्याने उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी रोहा उप विभाग रोहा, ता. रोहा यांस प्राधिकृत करण्यात आले आहे.

पान ६ वर

पान ५ वरून

१० महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी, फेब्रुवारी १७, २०२६/माघ २८, शके १९४७

**परिशिष्ट १**

**गावाचे नाव झाप, ता. सुधागड, जि. रायगड**

| अ.क्र. (१) | स.नं./ग.नं. (२) | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) (३) | संपादित करावयाचे क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) (४) |
|---|---|---|---|
| १ | ९ | ०.८३.२० | ०.००.८० |
| २ | १० | ०.८२.६० | ०.२०.०० |
| ३ | ४० | ०.७०.४० | ०.१८.५० |
| ४ | ४१ | ०.३४.१० | ०.०९.६० |
| ५ | ४२ | ०.४३.८० | ०.०८.६० |
| ६ | ४३ | १.२९.९० | ०.०१.५० |
| ७ | ४४ पैकी | ०.८०.२० | ०.०८.२० |
| ८ | ४५ | ०.२४.०० | ०.००.७५ |
| ९ | ४६ | ०.०६.०० | ०.०८.६५ |
| १० | ४७ | ०.९१.६० | ०.१७.२० |
| ११ | ५३ | ०.२९.०० | ०.००.४५ |
| १२ | ५४ पैकी | १.०१.०० | ०.००.७० |
| **एकूण** | | | **०.९४.९५** |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नाव :** रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता भूसंपादनाचा प्रस्ताव.

**प्रकल्पाचे विवरण :** रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील मौजे झाप ०-९४-९५ हे.आर.,क्षेत्राचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा. ५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० करीता जमिनीचे संपादन.

**सामाजिक फायदे :** रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील मौजे झाप या गावांतील जमिनीचे पाली पाटणूस मार्ग (प्र.रा.मा.५ ला मिळणारा मार्ग) रा.मा. ९४ पाली गावातील वळण रस्ता कि.मी. ०/०० ते ३/०० या प्रयोजनासाठी संपादित करण्यात येत असून सदर प्रकल्पामुळे रहदारीसाठी रस्ता होऊन लोकांना ये - जा करण्यासाठी सोईचे होणार आहे.

**परिशिष्ट ३**

**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण :- निरंक**

**परिशिष्ट ४**

**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा : महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग ४-अ दि. ७ जानेवारी २०२६/पौष १७, शके १९४७ अन्वये भूमी संपादन, पूनर्वसन व पूनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०क द्वारे लोकहितास्तव उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोनच्या आणि प्रकरण तीनच्या तरतूदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट दिली आहे.

**परिशिष्ट ५**

**प्रशासक नियुक्तीचे विवरण :- निरंक**

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**टीप.**—प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उप विभागीय अधिकारी रोहा, उप विभाग रोहा यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

रोहा,
दिनांक : १२ फेब्रुवारी २०२६.

**ज्ञानेश्वर खुटवड,**
सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, रोहा
उप विभाग रोहा.

**क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/४४१/४४९/२०२६**

# याक शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याला भगदाड

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापुर तालुक्यात ग्रामीण भागात अनेक रस्त्यांची दयनीय अवस्था झाल्याचे पाहायला मिळाले, त्यामुळे अनेक जण या दयनीय अवस्था रस्त्यामुळे नाराजी व्यक्त करत असताना खालापूर नगरपंचायत हद्दीतील महड गावातील याक शाळेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याला भले मोठे भगदाड पडले आहे. रस्त्यावर जागोजागी तडा गेल्याने येथील ग्रामस्थ नाराजी व्यक्त करत आहेत. त्यामुळे संबंधित प्रशासनाने याचे गांभीर्य घेत या रस्त्याची दुरुस्ती करत नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

खालापुर नगरपंचायत हद्दीत अनेक प्रलंबित विकास कामे मार्गी लागत येथील नागरिकांना दिलासा मिळत असला तरी काही समस्यांमुळे नागरिकांना मानसिक त्रासाबरोबर शारीरिक त्रासही सहन करावा लागत असल्याचे पाहायला मिळत असून यामध्ये महड गावातील याक शाळेकडे जाणारा रस्ता खराब झाल्याने येथील ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत असून काँक्रिटीकरण करण्यात आलेल्या रस्त्याला जागोजागी क्रॅक व भला मोठा भगदाड पडल्याने सर्व जण संताप व्यक्त करत असून संबंधित प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने येथील ग्रामस्थ नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे संबंधित प्रशासनाने याचे गांभीर्य घेत या रस्त्याचे पुन्हा नव्याने दुरुस्ती करावी अशी मागणी सध्या जोर धरत आहे.

> **“ महड गावातील याक शाळेकडे जाणाऱ्या रस्ता खराब झाल्याने याचा नाहक त्रास आम्हा ग्रामस्थांना करावा लागत असून या रस्त्यावर जागोजागी क्रॅक गेले आहे. त्याचबरोबर रस्त्यावर भलामोठा भगदाड पडल्याने हा रस्ता अपघाताला आमंत्रण देत असतानाही याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत आहे, त्यामुळे संबंधित प्रशासनाने याचे गांभीर्य घ्यावे जेणेकरून दुर्घटना घडणार नाही.**
> **–जयेश पाटील,**
> **ग्रामस्थ महड ”**

## धामणसईत हनुमान जन्मोत्सव

खांब : रोहा तालुक्यातील धामणसई येथे मग़ळ.दि.३१ मार्च ते गुरूवार (दि.२) एप्रिल या कालावधीत हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवर्य अलिबागकर महाराज यांच्या कृपाछत्राखाली, गुरूवर्य गोपाळ वाजे, धोंडू कोलाटकर, सखाराम महाराज निकम यांच्या कृपाशीर्वादाने व गुरूवर्य नारायण वाजे, दगडू दळवी, मारूती कोलाटकर व बाळाराम शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या जन्मोत्सव सोहळ्यात मंगळवार दि.३१ रोजी काकड, ध्वजारोहन, कलश पूजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पूजन दिनेश कडव यांची प्रवचन सेवा आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. या संपूर्ण सोहळ्याचे यशस्वीतेसाठी भैरवनाथ ग्रामस्थ व महिला मंडळ धामणसई व तरूण मंडळ धामणसई अधिक मोलाचे सहकार्य करीत आहेत.

# ठाकुरवाडीतील विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



खालापुर तालुक्यातील ग्रामीण जांबरुंग ठाकुरवाडीतील रायगड जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना वाहनाचे साधन नसल्याने अडीच ते तीन किलोमीटरचे अंतर पायी चालत जावे लागत. खालापुर तालुक्यातील ग्रामीण जांबरुंग ग्रामपंचायत हद्दीतील जांबरुंग ठाकुरवाडीमधील ५ ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे गिरवण्यासाठी जवळपास अडीच ते तीन किलोमीटर अंतर पायी कापावे लागत असे, त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना मोठ्या समस्येचा सामना करावा लागत असल्याने येथील विद्यार्थी हे अंतर कापत असताना त्यांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याने येथील विद्यार्थ्यांची समस्या लक्षात घेत येथील विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बेतर्फे कॅनडा रोबको संस्थेच्या माध्यमातून जवळपास ४६ सायकलींचे वाटप करत विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणीतून सुटका केली असून या सायकलींचे वाटप शुक्रवारी (दि.२७) मार्च रोजी केल्याने विद्यार्थ्या चेहऱ्यावर हसू पाहायला मिळाले. इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बेतर्फे कॅनडा रोबको संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी शिल्पा खांडेकर संदेश कांबले, प्रशांत खांडेकर, रमेश खांडेकर, मारुती गायकर, संतोष पवार, शिल्पा दास, गोविंद दरवडा, भावना त्रिवेदी, भावना दोसी, भगवान हिंदोला, अलका मेंगाल, तातू हिंदोला, अनंता मेंगाल, देवराम हिंदोला, लक्ष्मण मेंगाल, शिवाजी शिंदे, सुगिता गवळी, वैशाली गायकवाड आदीसह बचत गटातील महिला वर्ग, अंगणवाडी सेविका आशा वर्कर व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

# बापूजी देवाच्या वर्धापनदिनाची जय्यत तयारी

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरातील कुंभार आळी येथे मंगळवार (दि.३१) एप्रिल रोजी स्वयंभू बापूजी मंदिर देवस्थानचा प्रथम वर्धापनदिन व बुधवार दि.१ एप्रिल रोजी बापूजी देव यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी पार पडणाऱ्या वर्धापनदिन दिनानिमित्त भूपाळ्या, काकड आरती, उदकशांती, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मूर्तींवर अभिषेक, हरिपाठ, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत तर बुधवारी यात्रा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या यात्रेला जवळपास तीनशे वर्षांचा इतिहास आहे. चैत्र पोर्णिमेला सकाळपासून कुंभार आळी येथे यात्रेला सुरुवात होते. यावेळी बापूजी देव मंदिराशेजारी विविध प्रकारची दुकाने थाटली जातात. दिवसभर ही यात्रा भरते. या यात्रेनिमित्त दोन देवतांच्या भेटीचा कार्यक्रम पार पडतो. मालाठे गावची डोनोबाची काठी कुंभार आळी येथे बापूजी देव मंदिराच्या भेटीसाठी येते. या ठिकाणी दोन्ही काठ्यांची भेट घडवली जाते. मालाठे गावची डोनोबाची काठी कुंभार आळी ग्रामस्थ नाचवत ब्रिटिश कालीन पोलीस चौकी च्या पाठीमागे असलेल्या देवीच्या स्थानाजवळ भेटीसाठी घेऊन जातात. त्यांच्यापाठोपाठ मालाठे ग्रामस्थ देखील उपस्थित असतात. परंतु भेटीसाठी काठी घेऊन जाण्याचा मान हा कुंभार आळी ग्रामस्थांना देण्यात आलेला असतो. देवीच्या स्थानावर भेट घेतल्यानंतर कुंभार आळी ग्रामस्थ डोनोबाची काठी मालाठे ग्रामस्थांच्या हाती सुपूर्द करतात. त्यानंतर मालाठे ग्रामस्थ डोनोबाची काठी शहराची ग्रामदेवता चंडिका देवीच्या मंदिरात घेऊन जातात. या भेटीनंतर कुंभार आळी येथील यात्रेची सांगता होते. या दोन्ही कार्यक्रमाची कुंभारआळी ग्रामस्थांकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

दि. २८/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. संदिप रमेश फाटक वगैरे यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरच्या मिळकती या निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | नगर भुमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| धोकवडे | ३१२ | १७४०.१० | अ |
| ता. अलिबाग | ३१५ | ५७१.१० | अ |

वर वर्णन केलेल्या मिळकती या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरच्या मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**अ‍ॅड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ७७४३८०९६५३

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला,
काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२

क्रं. अपिल/डेस्क/आरटीएस/अपिल/९२७/२०२५ दिनांक : १२.०३.२०२६

**जाहिर नोटीस**

प्रतो.

१. श्री. मोरेश्वर भिवा शिर्के
रा. वडगांव, पो. पेण, ता. पेण, जि. रायगड

२. श्री. दत्तात्रेय भिवा शिर्के
रा. वडगांव, पो. पेण, ता. पेण, जि. रायगड

३. श्री. जगदीश भिवा शिर्के
रा. कोप्रोली, पो. कोप्रोली, ता. पेण, जि. रायगड

४. सौ. वंदना विजय पाठारे
रा. कोट आळी, पेण, ता. पेण, जि. रायगड

५. सुमन एकनाथ काळभोर
वैशाली एकनाथ काळभोर
रा. जिजामाता नगर, वागळे इस्टेट, जि. ठाणे

६. श्रीमती आशा सुरेश ठाकुर .... **अर्जदार**
श्रीमती श्वेता सुरेश ठाकुर
रा. रुम नं.८. ए विंग, शिवम बिल्डींग, चिंचपाडा, पेण, ता, पेण, जि. रायगड

विरूद्ध

१. श्री. अक्षय मनोहर मालुसरे
रा. अकुल वाडी, पो. गुलसुंदे ता. पनवेल, जि. रायगड

२. सौ. अक्षता वसंत गोळे
कु. अक्षता मनोहर मालुसरे (पूर्वाश्रमीचे)
रा. हातोंड, पो. परळी, ता. सुधागड, जि. रायगड ..... **सामनेवाले**

विषय:- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद/अपिल क्र.२५२/२०२४ दि.१०.०६.२०२५ चे विरुद्ध अपिल अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १३.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास अपिल अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**अतिरिक्त विभागीय आयुक्त**
**कोकण विभाग करीता**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची बिनशेती मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची बिनशेती मिळकत असून सदर मिळकत श्री. हेमंत सजनराव शेवाळे व इतर १ यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. / प्लॉट नं. | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. शरद दिनानाथ अनवेकर | ८९/२७/अ/२७ | १२.८८.०० | १२८.८० |

वरील प्रमाणे बिनशेती मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर बिनशेती मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क -हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर बिनशेती मिळकतीवरील विद्यमान मालक श्री. शरद दिनानाथ अनवेकर यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल व सदर बिनशेती मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : २९/०३/२०२६

सही/-
**अ‍ॅडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता - शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakashibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाची शेती मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पांडुरंग भागु खताळ, व १ दोघेही रा. खेमवाडी, ताडगाव, ता. सुधागड, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ७३/१ | ५-९९-०० | २.०० |
| पैकी २.००.०० हे. आर | | |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २८/०३/२०२६

सही/-
**अ‍ॅड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मधुकर जानू खोत उर्फ काटकर रा. बापळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बोरघर ता.अलिबाग | २६३/२ | ०-०८-८०<br>पो. ख. ०-०२-८०<br>०-११-६० | ०-१६ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक :- २८/०३/२०२६

**अ‍ॅड. प्राची लक्ष्मण पाटील**

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **सर्व प्रकारचे आजार लठ्ठपणा**/मधुमेह/संतानप्राप्ती/घरबसल्या लाखो कमविण्यासाठी (वेळ ठरवूनच) डॉ. नथुराम शिहू (नागोठणे-पोयनाड) रायगड ४०२१०६/७५०७१६६०१५

● **जागा विकणे आहे :** आमची आक्षी स्तंभाजवळील २०.३ गुंठे जागा विकणे आहे. प्रवेश- अलिबाग रेवदंडा रोडवरून थेट कॉलनीचा मुख्य प्रवेश आहे. जागा पूर्ण सपाट आहे व जागेला पूर्ण कंपाऊंड आहे. जागेमध्ये २५ नारळाची व २५ सुपारीची झाडे आहेत. जागेचा प्रवेश पूर्व पश्चिम आहे. इच्छुकांनी थेट संपर्क करावा. संपर्क : ०९६१९०१६१३५

● **रामनाथ वरसोली, चेंढरेमध्ये गाळा** किंवा रुम भाड्याने पाहिजे. रोड टच ९७६५९८४५२५

● **बागायती वाडी विक्री–१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर)** @ २२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक–सुहास माळी गाव–थळ गुंजाळ आळी अलिबाग रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : आरोग्यावर मानसिक त्रासाचा परिणाम होईल. उलटून बोलू नका. कोणासही दुखवू नका.
- **वृषभ** : प्रगतीतील अडथळे दूर होतील. दिलेला शब्द पाळाल. समाजात सन्मान मिळेल.
- **मिथुन** : कोणावरही राग काढू नका. अकारण अस्वस्थता वाटेल. पतीपत्नीमध्ये गैरसमज वाढतील.
- **कर्क** : आर्थिक समस्या सुटतील. मनातील इच्छा पूर्ण होतील. प्रतिष्ठित व्यक्तीची ओळख होईल.
- **सिंह** : संततीचे हट्ट त्रासदायक ठरतील. भागीदारीतून त्रास होईल. कामामध्ये मन गुंतवावे लागेल.
- **कन्या** : प्रिय व्यक्तीचा सहवास लाभेल. कला-क्रीडा क्षेत्रात यश लाभेल. प्रवास सुखकर होईल.
- **तूळ** : खरं-खोटे करत बसू नका. आज मौनव्रत उत्तम राहील. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक.
- **वृश्चिक** : बिघडलेले संबंध सुधारतील. दिलेली आश्वासने पाळाल. प्रतिष्ठित व्यक्तीकडून लाभ होईल.
- **धनु** : आर्थिक फसवणुकीची शक्यता. कमी होण्याऐवजी खर्च वाढेल. कोणाची नाराजी पत्करू नका.
- **मकर** : ज्येष्ठांशी मतभेद होतील. कामाची धावपळ वाढणार आहे. काल्पनिक भीती वाढेल.
- **कुंभ** : कामाची योग्य दाद मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. नशिबाची साथ मिळेल.
- **मीन** : योजलेली कामे पूर्ण होतील. लिखाणाला प्रसिद्धी मिळेल. प्रेरणादायक दिवस.

ब्युटी टॉक

## लिपस्टिकच्या भन्नाट शेड्स

* उन्हाळ्यात गडद रंगांचा जास्त भपका वाटत असला तरी प्लम शेडची लिपस्टिक उन्हाळ्यातच जास्त चांगली वाटते. गडद मरूनसारखी ही शेड उन्हाळ्यातल्या रात्रीच्या समारंभासाठी अगदी बेस्ट आहे. भारतीय आणि वेस्टर्न अशा दोन्ही प्रकारच्या पेहरावांवर ही शेड चालून जाते. फार गोऱ्या महिलांनी हा रंग टाळावा. गव्हाळ वर्णाच्या महिलांना प्लम शेड अधिक शोभून दिसेल.

* केशरी रंगाच्या लिपस्टिकला बऱ्याच जणी लांब ठेवतात. पण यंदाच्या उन्हाळ्यात या रंगाची बरीच चलती असेल.

* काळ्या रंगाची लिपस्टिक लावण्याचा आपण विचारही करू शकत नाही. मात्र यंदाच्या हंगामात डार्क ब्लॅक शेडच्या लिपस्टिकचा ट्रेंड आहे. 'डाई नाईट' या नावाने ही शेड ओळखली जाते. बॉलिवूडमधल्या बऱ्याच अभिनेत्री या शेडची लिपस्टिक लावतात.

* सोनेरी रंगाची लिपस्टिकही तुम्ही कॅरी करू शकता.

## २९ मार्च

दिनविशेष

- १९४८ : साहित्यिक नागनाथ कोतापल्ले यांचा जन्म.
- १९७० : दत्तो वामन पोत्तदार यांनी 'शिवचरित्र' या ग्रंथाच्या लेखनास प्रारंभ केला.
- १९८२ : एन.टी.रामाराव यांनी तेलगू देसम पक्षाची स्थापना केली.
- २०१४ : भू-संपादन कायद्यातील सुधारणांच्या वैधतेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.
- २०१७ : लोकसभेने वित्त विधेयकात सुचवलेल्या दुरुस्त्या बहुमताने फेटाळल्या.

करीअर टिप्स

## संधी आंतरराष्ट्रीय कायद्यातल्या

दोस्तांनो, आपल्या देशात परदेशातल्या कंपन्या येतात. विविध कंपन्या एकमेकांमध्ये विलिन होतात. काहींचे करार होतात. मोठी कंपनी दुसऱ्या कंपनीला खरेदी करते. कंपनीच्या कारभाराशी संबंधित अनेक कायदे असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे कायदे तसंच विविध संधींचं ज्ञान असणाऱ्या वकिलांची मागणी वाढते आहे. बारावीनंतर पाच तर पदवीनंतर तीन वर्षांचा कायद्याचा अभ्यासक्रम असतो. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी परदेशी भाषांचं ज्ञान उपयोगी पडू शकतं. तुमच्याकडे लेखन कौशल्य असायला हवं. विविध देशांमधल्या कायद्यांचा अभ्यास करून त्याचं विश्लेषण करण्याची क्षमता हवी. सतत नव्या गोष्टी शिकायची तयारी असायला हवी. आंतरराष्ट्रीय कायदे वेगवेगळ्या बाबींशी निगडित असतात. मानवाधिकार, निर्वासितांना मिळणारी वागणूक, पाण्याशी संबंधित तसंच अंतराळातल्या वावराशी संबंधित कायदे, शस्त्रास्त्र नियमन कायदा, गुन्हेगारांचं हस्तांतरण, आंतरराष्ट्रीय न्यायालयांमध्ये वकिली करणं असे असंख्य पर्याय तुमच्याकडे आहेत. तुम्ही तुमच्या आवडीच्या विषयात नैपुण्य मिळवून पुढे जाऊ शकता.

### पंचांग

**रविवार, २९ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. ११, चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : आश्लेषा, योग : धृति,
सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.५०

### फॉरवर्ड्स

**यहाँ हर शख़्स क़ा चेहरा क़ुछ बातें छुपाना जानता हैं...**

**पता नहीं फ़िर भीं मुस्कुराना जानता हैं...!**

माहीत आहे?

## इतिहासाच्या पाऊलखुणा

पूर्वी मनोरंजनाची सीमित साधने असताना लोकांना रेडिओचाच आधार होता. रेडिओ, त्याचे उद्घोषक, कार्यक्रम आणि त्यावर वाजणारी गाणी यांचा प्रभाव आजही जुन्या पिढीवर दिसून येतो. चला तर मग, या रेडिओबद्दल जाणून घेऊ या. भारतातील रेडिओ हे सर्व वयोगटांसाठी एक कनेक्शन, नाते, एक भावना आणि गोड भावनांचा जादूगार आहे. ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबईतील विल्सन कॉलेजच्या बावीस वर्षीय विद्यार्थिनी उषा मेहता यांनी गुप्त रेडिओ स्टेशन सुरू केले. त्यांची पहिली घोषणा होती, '४२.३४ मीटरवर आम्ही कॉंग्रेस रेडिओवरून भारतातील कुठल्यातरी अज्ञात ठिकाणाहून बोलत आहोत.' नंतर या कॉंग्रेस रेडिओवरून राष्ट्रीय नेत्यांचे संदेश प्रसारित झाले.



१९४२ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद रेडिओचे जर्मनीतून प्रसारण सुरू झाले. नंतर महायुद्धामुळे आझाद हिंद रेडिओ सिंगापूर आणि रंगूनला हलवण्यात आला. 'आझाद हिंद रेडिओ' हे बहुभाषिक वाहिनी होते ज्यामध्ये इंग्रजी, हिंदी, तमिळ, बंगाली, मराठी, पंजाबी, पश्तो आणि उर्दूमध्ये प्रसारण करण्यात आले. ११ नोव्हेंबर १९४७ रोजी महात्मा गांधींना पाकिस्तानातून कुरुक्षेत्रातील निर्वासितांच्या छावण्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना भेटण्यासाठी यावे लागणार होते. मात्र काही कारणास्तव त्यांना हा कार्यक्रम रद्द करावा लागला. त्यामुळे त्यांनी आकाशवाणीवरून या लोकांना संबोधित करण्याचे ठरवले. हा दिवस देखील महत्त्वाचा आहे कारण या दिवशी महात्मा गांधी पहिल्यांदा आणि शेवटच्या वेळी आकाशवाणीत आले होते.

### भटकंती

* उत्तराखंडमधलं कनाताल चंबा-मसुरी रस्त्यावर वसलेलं, समुद्रसपाटीपासून ८५०० फूट उंच आहे. इथून साधारण दहा किलोमीटर अंतरावर सुरकुंडा देवी मंदिर आहे. तिथे तुम्ही वॉटरस्पोर्टसचा आनंद लुटू शकता. इथून एक किलोमीटर अंतरावर केडिया जंगल आहे. * उत्तराखंडमधल्या लॅंसडाउन इथे पाईन आणि ओकची भरपूर झाडं आहेत. १८८७ मध्ये लॉर्ड लॅंसडाउनने हे ठिकाण शोधलं. कालूदांडा हे याचं मूळ नाव. भुल्ला नावाचा छोटा तलाव तुम्हाला आकर्षित करेल. इथून सूर्योदय आणि सूर्यास्ताचं अनोखं दृश्य पहायला मिळेल. **(क्रमश:)**

गुंतवणूक

## बचतीचे पर्याय अभ्यासताना...

लहान वयापासून बचतीची सवय लागली तर आर्थिक शिस्त लागतेच शिवाय भविष्यकाळ अधिक सुरक्षित होतो. नोकरीला नुकतीच सुरूवात केलेल्या तरूणांवर जबाबदाऱ्याही कमी असतात. त्यामुळे ३० टक्के बचतीचं लक्ष्य ठेवता येतं.



* सर्वप्रथम गुंतवणुकीचे योग्य मार्ग शोधा. गुंतवणुकीचा योग्य पर्याय निवडला नाही तर भविष्यात महागाईचा दर वाढल्यावर आपल्या पैशांचं मूल्यही कमी होतं. त्यामुळे अशा गुंतवणुकीला काहीच अर्थ उरत नाही. * फारसे धोके पत्करायचे नसतील तर पोस्ट ऑफिसमधल्या योजना, एनएससी, सुकन्या अशा योजनांमध्ये गुंतवणूक करता येईल. बॅंकेच्या तुलनेत पोस्ट ऑफिसमधल्या योजनांवर चांगलं व्याज मिळू शकेल. * गुंतवणुकीत थोडे धोके पत्करायचे असतील तर शेअर बाजार, म्युच्युअल फंड यात गुंतवणूक करा. नुकतीच नोकरी सुरू केली असेल तर तुम्ही काही धोके पत्करू शकता. फारशा जबाबदाऱ्या नसल्यामुळे हे शक्य होतं. * गाव किंवा शहराच्या लगतच्या प्लॉटमध्ये पैसे गुंतवणं ही एक महत्त्वाची गुंतवणूक ठरू शकते. पुढील दहा वर्षांमध्ये या जागेची किंमत काही पटीने वाढू शकते. त्यासाठी या परिसराचा अभ्यास मात्र नेटका हवा.

खेचाखेची

### घोटाळा

कॉलेजमध्ये सुंदर मुलगी दिसली, की कॉलेज विधानसभेसारखं वाटतं...

ती एखाद्या मुलाकडे पाहून हसली, की त्याला बिनविरोध आमदार झाल्यासारखं वाटतं...

एकदा का ती लग्नाला हो म्हणाली, की मुख्यमंत्री झाल्यासारखं वाटतं...

आणि लग्नाला एक वर्ष झालं, की मग घोटाळा केल्यासारखं वाटतं!

### वेगळं काही

ब्रिटनमधली ऱ्होडा रॉड्रिक्स डियाज ही मुलगी एका दुर्मीळ आजाराने ग्रस्त आहे. यामुळे तिला खूप झोप येते. या झोपेमुळे तिला विद्यापीठाकडून घेण्यात येणारी अत्यंत महत्त्वाची परीक्षा देता आली नाही. या विकाराला क्लेईन लेविन सिंड्रोम असं म्हणतात. यामुळे एका वेळी ती सलग २१ तास झोपते. पाच मिनिटांत उठते असं तिला म्हणताच येत नाही कारण तिची पाच मिनिटं म्हणजे किती तास हे सांगता येणार नाही. २०१८ मध्ये ऱ्होडाच्या या विकाराचं निदान झालं. यावर तिने काही उपचार करून घेतले असले तरी त्यातून काही साध्य झालं नाही. डॉक्टरांच्या मते हा मेंदूशी संबंधित विकार असून वय वाढलं की त्याचा प्रभाव कमी होतो.

डाएट मंत्रा

## रोज खा 'आयुर्वेदिक अंडी'

शाकाहारी लोक स्वत:च्या आहारपद्धतीबद्दल कमालीचे आग्रही असतात. मात्र या आहारामुळे त्यांच्या शरीराला काही पोषक घटकांचा तुटवडा जाणवतो. हे लोक अंडं खायलाही नकार देतात. पण त्यांची समस्या आता संपली आहे. आता बाजारात आयुर्वेदिक अंडी दाखल झाली आहेत. नेहमीच्या अंड्याची किंमत आठ ते दहा रुपये असताना आयुर्वेदिक अंडं २२.५० रुपये प्रति नग या किमतीला उपलब्ध आहे. चिन्ना हर्षवर्धन रेड्डी नामक उत्पादकाने अशाप्रकारच्या अंड्यांचं उत्पादन घेण्यास सुरूवात केली आहे. त्यांनी सखोल संशोधन करुन 'सौभाग्य ग्रुप पोर्ट्री फार्म' सुरू केलं. त्यातील कोंबड्यांना हेवी स्ट्रेरॉईड्स, हार्मोन्स अथवा अँटी बायोटिक्सयुक्त इंजेक्शन न देता पौष्टिक तत्त्वांनी युक्त आयुर्वेदिक खाद्यघटक दिले जातात. हळद, लसूण आणि ४० आयुर्वेदिक पदार्थांचं मिश्रण असणारा खुराक घेऊनच या कोंबड्या वाढतात. त्यांच्यासाठी मिनरल वॉटरची सोय असते. त्यामुळे त्यांच्यापासून मिळणारी अंडी रंगाने आणि उपयुक्ततेच्या दृष्टीने साध्या अंड्यांपेक्षा सरस असतात. त्यांच्या सेवनाने शारीरिक आणि मानसिक ताकद वाढण्यास मदत होते.



## सुडोकू ८५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | | | १ | | ४ | ६ |
| | | ४ | ५ | | | | | |
| ९ | | | | | ३ | | ७ | |
| ८ | | ६ | | | ५ | | | ३ |
| ४ | | | २ | १ | ८ | | | ७ |
| २ | | | ६ | | | ८ | | १ |
| | ९ | | ३ | | | | | २ |
| | | | | | ७ | ५ | | |
| ३ | २ | | १ | | | ६ | | |

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८४चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७ | ८ | ४ | १ | ५ | ६ | ९ | २ |
| २ | ९ | ५ | ७ | ३ | ६ | ८ | ४ | १ |
| ६ | १ | ४ | ८ | ९ | २ | ७ | ३ | ५ |
| १ | ६ | ९ | ३ | २ | ४ | ५ | ८ | ७ |
| ८ | ३ | २ | ६ | ५ | ७ | ४ | १ | ९ |
| ५ | ४ | ७ | ९ | ८ | १ | २ | ६ | ३ |
| ४ | ८ | ३ | २ | ७ | ९ | १ | ५ | ६ |
| ९ | २ | १ | ५ | ६ | ८ | ३ | ७ | ४ |
| ७ | ५ | ६ | १ | ४ | ३ | ९ | २ | ८ |

## शब्दकोडे क्रमांक ८५

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | | ४ | | ■ | ५ | ■ | ६ | ७ | ■ | ८ |
| | ■ | ९ | | ■ | ■ | | ■ | १० | | ११ | | | | ■ |
| ■ | १२ | | ■ | १३ | १४ | | १५ | | ■ | | ■ | | ■ | १६ |
| १७ | ■ | १८ | १९ | | | ■ | | ■ | २० | | २१ | | ■ | |
| २२ | २३ | ■ | २४ | | ■ | २५ | | २६ | ■ | ■ | २७ | | | |
| ■ | २८ | | | ■ | २९ | ■ | ३० | | | ३१ | ■ | | ■ | |
| ३२ | | ■ | ■ | ३३ | | | ■ | | ■ | ३४ | ३५ | ■ | ३६ | |
| ■ | ३७ | ३८ | ३९ | | ■ | ■ | ४० | | | ■ | | ■ | | ■ |
| ४१ | ■ | ४२ | | ■ | ४३ | ४४ | | | ■ | ४५ | | ४६ | | ४७ |
| ४८ | | | ■ | ४९ | ■ | ५० | | ■ | ५१ | | ■ | | ■ | |
| | ■ | ५२ | | ■ | ५३ | | ■ | ५४ | | | ■ | ५५ | | |
| | ■ | | ■ | ५६ | | | ५७ | ■ | | ■ | ५८ | | ■ | |
| ५९ | ६० | ■ | ६१ | ■ | | ■ | ६२ | ६३ | | ६४ | ■ | | ■ | |
| ■ | ६५ | | | ६६ | | | ■ | | ■ | ६७ | | | ■ | |
| ६८ | | ■ | ६९ | | | ■ | ७० | | | | ■ | ■ | ७१ | ■ |

**आडवे शब्द :-**

१) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
६) संध्याकाळ
८) अथवा
९) व्यग्र, गुंग
१०) मालाचे येणेजाणे
१२) उशी (इं.)
१३) सूर्यबिंब
१८) भीतिदायक, प्रचंड
२०) प्रत्येक दिवशी
२२) टपाल
२४) खंदक
२५) धोका
२७) गाजावाजा
२८) समोरासमोरची लढत
३०) बारीक झणझण
३२) भोळा मनुष्य
३३) मोठी जाड सुई
३४) माफ
३६) हरबऱ्याच्या झाडावरील दवाचे थेंब
३७) लिहिता-वाजता येणे
४०) नूतन
४२) गळाला अडकणारा जलचर
४३) उंच वास्तू
४५) अपमान
४८) मुलगी
४९) एक प्रश्नार्थक शब्द
५०) दह्याचे पातळ पेय
५१) आम रसाची पोळी
५२) रुची, स्वाद
५३) वानर
५४) अग्नी
५५) लेखक, कविने लिहिलेले छापील बाड
५६) देवाचे देहधारी रूप
५८) धातूचा धागा
५९) पोळ्या भाजण्याचे पात्र
६२) माजघर, भोजनशाळा
६५) एकमेकांपुढे
६७) जागविणारा आवाज
६८) अश्व
६९) मसाल्यातील पान
७०) चित्र काढणारा
७१) आकाश

**उभे शब्द :-**

१) परमेश्वर
२) पैशाची हाव
३) खाऊन संपविणे
४) चंचल
५) विळखा, मिठी
६) तिखट मीठाचा शिरा
७) बहुतकरुन
८) वचक, भीती
१०) व, आणखी
११) खबदडी
१३) काळ्या तोंडाचे माकड
१४) पाढ्यातील सहा
१५) भ्रमर
१६) पालखी, मेणा
१७) तांबूल
१९) विनंती, मागणी
२१) आजाराचे नाव
२३) जेमतेम
२६) प्रफुल्लित
२९) आकाश
३१) छाती
३३) देणारा
३५) मनुष्य
३६) उग्र, जळजळीत
३८) माफी मागणारा
३९) पृथ्वी
४०) यमनगरी
४१) काटकसर
४४) आई-वडील
४५) कैद
४६) मुद्दाम, जाणूनबुजून केलेले
४७) चित्रपटातील प्रमुख नट, नटी
५१) अवयव असलेला
५३) अगदी क्षुल्लक किंमत
५७) रवाळ पीठ
६०) गाईचे पिल्लू
६१) तसराळे
६३) चांदणी
६४) समुद्र
६६) पूर्ण ऐक्य, पूर्ण भरती

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ने | क | दा | ■ | पा | वा | ■ | खं | डी | ■ | अ | च | क | ट |
| वा | ट | ■ | न | ■ | त | ड | त | ड | ■ | का | व | ■ | ळ | ■ |
| ज | ■ | चो | प | डी | ■ | व | र | ■ | स | ■ | सा | रा | सा | र |
| वी | र | ■ | त्र | ■ | वा | डी | ■ | स | मा | धा | न | ■ | ध्या | ■ |
| ■ | ब | क | ■ | हे | म | ल | ता | ■ | चा | वा | ■ | पा | य | ल |
| ड | र | ■ | ज | ■ | ना | ■ | ले | स | र | ■ | द | ल | ■ | ता |
| झ | ■ | हे | वा | ■ | व | ण | वा | ■ | ■ | म | ल | म | ल | ■ |
| न | र | ■ | न | म्र | ता | ■ | र | क्षा | ■ | न | द | ■ | क्ष | मा |
| ■ | म | ल | म | ■ | र | सा | ■ | र | मा | ■ | ल | व | ण | ■ |
| स | ण | ■ | र्द | ■ | ■ | व | ट | ■ | वा | सा | ■ | र्ष | ■ | मा |
| टा | ■ | ख | ■ | ना | ■ | धा | क | ला | ■ | मा | ड | ■ | प | सा |
| स | र | डा | ■ | क | मा | न | ■ | ज | वा | न | ■ | व | ण | ■ |
| ट | क | ■ | सा | ■ | न | ■ | को | रा | ■ | सु | पा | री | ■ | ना |
| ■ | मा | का | ■ | वा | स | र | ■ | ■ | स | मा | न | ■ | स | ट |
| का | ला | बा | जा | र | ■ | स | रो | ज | ■ | न | ■ | स | र | की |

# मुलांमधील लठ्ठपणा व स्थूलता निवारण



डॉ. राजेंद्र चांदोरकर
बालरोगतज्ज्ञ, अलिबाग

लहान मुलांमधील स्थूलता (विशेष करुन किशोरवयीन मुलांमधील स्थूलता) ही एक जागतिक समस्या बनत चालली आहे. ठराविक वय, उंची व लिंगासाठी आवश्यक असणाऱ्या सर्वसाधारण वजनापेक्षा अधिक वजन म्हणजे स्थूलता होय. शरीरातील त्वचेखाली व इतर अवयवांमध्ये जेव्हा जास्तीची चरबी साठते तेव्हा स्थूलता निर्माण होते. स्थूलता मुलांच्या शारीरिक, मानसिक वाढ व विकासात अडथळा निर्माण करते, त्यामुळे ती टाळणे ही काळाची गरज आहे.

मागील वीसेक वर्षांत जगभरात. विशेष करुन भारतासारख्या विकसनशील देशात लहान मुलांमधील स्थूलतेचं प्रमाण खूप झपाट्यानं वाढताना दिसत आहे.

लहान मुलांमधील स्थूलता व भविष्यात होणारे स्थूलतेचे गंभीर शारीरिक व मानसिक परिणाम याकडे आपण सर्वांनी गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. भारतातील जवळपास १५ ते २० टक्के मुलांचे वजन प्रमाणापेक्षा जास्त आहे, असे काही सर्वेक्षणांतून दिसून आले आहे. शहरी भागात काही खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये हेच प्रमाण ३० टक्क्यांपेक्षाही जास्त दिसून येत आहे. आता सारासार विचार केल्यास लहान मुलांमधील स्थूलता हे एकविसाव्या शतकातले सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने सर्वात मोठे काळजीचे कारण आहे. या सर्व परिस्थितीचे गांभीर्य वेळीच ओळखून जागतिक आरोग्य संघटना व आपल्या देशातील बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांची संघटना इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रीशियन्स यांनी यावर त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

स्थूलतेची कौटुंबिक पार्श्वभूमी, काही आजार व औषधं यासारखी कारणे सोडली तर बऱ्याचशा प्रमाणात स्थूलता ही लहान मुलांच्या बदलत्या जीवनशैलीत दडलेली आहे, असं म्हटलं तर काही वावगं ठरणार नाही. अलिकडे वेगाने घडणारे शहरीकरण, आर्थिक सुबत्ता व पाश्चिमात्य जीवनशैलीचे अनुकरण यामुळे लहान मुलांचा आहार झपाट्यानं बदलत आहे. याचबरोबर तंत्रज्ञानाच्या अतिवापरामुळे त्यांच्या शारीरिक हालचाली कमी होत आहेत व पर्यायाने त्यांना स्थूलतेला सामोरं जावं लागत आहे आणि हे विदारक चित्र व वस्तुस्थिती नक्कीच नाकारता येणार नाही.

पाहुयात काय कारणे आहेत लहान मुलांमध्ये दिसून येणाऱ्या स्थूलतेची?.... येथे आपल्याला मूल जन्माला येण्यापूर्वीपासूनचा आढावा घेणं इष्ट राहील. गर्भारपणामध्ये आईने योग्य आहार न घेतल्यास किंवा आईला गर्भारपणात मधुमेह झाल्यास बाळ उपजतच स्थूल असते. बाळाच्या जन्मनंतर बाळाला पुरेसं स्तनपान न दिल्यास, पावडरचे अथवा वरचे दूध दिल्यास बाळाचे वजन प्रमाणापेक्षा जास्त वाढण्याची शक्यता होते. यानंतर बाळाला पूरक आहार सुरु करताना तूप, साखर, गूळ इत्यादी वापरून विविध पदार्थ दिले जातात. पुढे हळूहळू त्यांच्या आहारात बिस्किटे, केक, चिप्स, चॉकलेट्स अशा पदार्थांचा शिरकाव व्हायला सुरुवात होते आणि थोडे मोठे झाल्यावर मग पिझ्झा, बर्गर, फिंगरचिप्स, शीतपेये अशा जंक फूडशी मुलांची गट्टी होते, त्यांची चटक लागते. मागील वीस वर्षांत शीतपेय सेवन करण्याचं प्रमाण लहान मुलांमध्ये तब्बल ३०० पटींनी वाढलं आहे. याचबरोबर त्यांच्या मैदानी खेळांची जागा आता टी.व्ही., मोबाईल आणि व्हिडीओ गेम्सनी घेतली आहे. अभ्यासाच्या अतिताणामुळे येणारी शारीरिक हालचालींवरील मर्यादा, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सचा अतिवापर, परिणामी होणारी अपुरी झोप या सर्वांचा परिणाम म्हणजे वाढत्या स्थूलतेला आमंत्रण!

जाणून घेऊयात लहान मुलांमधील स्थूलतेचे दुष्परिणाम?.. वजन वाढले की आपल्या शरीरातील संप्रेरकांचा, शरीरातील पेशींच्या क्रियांचा, चयापचयाचा समतोल ढासळतो. वाढलेले वजन अनेक व्याधींना/रोगांना आमंत्रण देते. यामध्ये प्रामुख्याने मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच अनेक मानसिक व्याधीही जडतात. बेढब शरीरामुळे स्थूल मुलांचा स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो, त्यांचा आत्मविश्वास कमी होतो, ती एकटी-एकटी राहायला लागतात, मित्र-मैत्रिणींमध्ये मिसळायचे, खेळांमध्ये सहभागी व्हायचे टाळतात. या सर्वांमुळे त्यांना नैराश्यदेखील येऊ शकते. स्थूल मुलींच्या बाबतीत म्हणायचे झाले तर त्यांना मासिक पाळीच्या समस्या निर्माण होऊ शकतात तसेच पॉलीसिस्टिक ओव्हरीयन डिसिज (पी. सी.ओ.डी.) व वंध्यत्व यासारख्या समस्यांना सामोरं जावं लागतं.

स्थूलता निर्मूलन अथवा निवारण निश्चितच शक्य आहे. वर नमूद केलेले स्थूलतेचे एवढे सारे दुष्परिणाम पाहता, स्थूलता येऊच नये म्हणून योग्य वेळी खबरदारी व काळजी घेणेच इष्ट ठरेल नाही का?

गर्भारपणात मातेच्या आहाराची योग्य काळजी घेणं गरजेचं आहे त्याचबरोबर मातेचं वजन योग्य रीतीने वाढत आहे ना, मातेची रक्तशर्करा चांगली आहे, याची नेहमी खात्री करावयास हवी. असे केल्यास जन्मतःच बाळाचे वजन जास्त भरणार नाही. जन्मानंतर पहिले सहा महिने बाळास नेहमी केवळ स्तनपान करावे. या काळात काहीही देऊ नये. वरचे दूध, पावडरचे दूध पूर्णपणे टाळावे. याशिवाय बाळांना बाटलीची सवय मुळीच लावू नये. सहा महिन्यांनंतर बालकांना पूरक आहार चालू करताना त्यात शक्यतो साखर, गूळ, मीठ, तूप यांचा वापर करु नये अथवा चवीसाठी केलाच तर त्याचे प्रमाण अतिशय सौम्य असावे.

लहान मुलांच्या आहारात भाज्या आणि फळे यांचा पुरेसा समावेश असावा. त्यातील तंतुमय पदार्थ पोट भरायला मदत करतात, शिवाय जीवनसत्वे, खनिजे, क्षार इत्यादी पोषकद्रव्यही पुरवतात. तहान लागल्यानंतर मुलांनी पाणीच प्यायला हवे. हल्ली घराघरात सर्रासपणे शीतपेये आढळून येतात व तहान लागली की शीतपेये, सरबते यांना मुलं प्राधान्य देतात, हे चुकीचे आहे हे त्यांना समजावून सांगणे, ही खरी काळाची गरज आहे. बहुतांश पॅकबंद पदार्थ (बिस्किटे, केक, चिप्स, चॉकलेट्स इत्यादी) वजन वाढवण्यास कारणीभूत ठरतात. पॅकबंद पदार्थांवरील लेबल्स वाचल्यास आपल्याला त्याची प्रचिती येईल. या पदार्थांमध्ये साखर, मीठ आणि फॅट्सचा सढळहस्ते वापर असतो, त्यामुळे पिझ्झा, बर्गर, वडापाव, समोसा यासारख्या जंक फूडचे नियमितपणे सेवन करणे म्हणजे स्थूलतेला आमंत्रणच! कधीतरी बदल म्हणून खायला काही हरकत नसावी.

काही घराघरात टीव्ही सीरीअल्स बघता-बघता सामूहिक जेवण जेवले जाते. असे केल्याने प्रमाणापेक्षा अधिक अन्न सेवन केले जाते, जे टाळले पाहिजे. शिवाय टी.व्ही पाहणे म्हणजे मोकळ्या हवेत खेळण्याचा किंवा रात्री झोपेचा वेळ वाया घालवणे. टी.व्हीवरील जाहिराती मुलांना जंक फुडकडे आकर्षित करतात व हे पदार्थ पालकांनी घरात आणण्याचा मुलं हट्ट करतात. त्यामुळे लहानग्यांना टी.व्हीपासून दूर ठेवण्याचाच आपण प्रयत्न करावा.

शाळा, ट्युशन्स व पर्यायाने अभ्यासाच्या प्रचंड हेक्टिक शेड्युलमुळे मुलं मैदानी खेळ खेळण्यास टंगळमंगळ करतात व मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप, टॅब अथवा टेलिव्हिजनसमोर आपला उरलेला वेळ घालवतात. ही परिस्थिती बदलण्याची वेळ आली आहे. मुलांनी मोकळ्या हवेत, मैदान/पटांगणात खेळायला हवे. हे मैदानी खेळ म्हणजेच त्यांचा व्यायाम हे त्यांच्या मनावर बिंबवण्याचीच ही वेळ आहे. वेगवेगळ्या गॅजेट्समध्ये गुंतल्याने मुलं रात्री उशिरा झोपतात. त्यांना कमीत कमी आठ ते दहा तास झोपेची गरज असते. परीक्षेच्या काळात तर रात्री चहा, कॉफी, चिप्स खाऊन अभ्यासासाठी उशिरापर्यंत जागरण करतात जे चुकीचं आहे त्यामुळे मनावरील ताण व वजन वाढते व हा सर्व आटापिटा टाळणे गरजेचे आहे. लहान मुलांमध्ये सामूहिक स्तरावर स्थूलतेचा सामना करण्यासाठी पालक, शाळा, समाज व डॉक्टर्स या सर्वांची भूमिका खूप महत्त्वाची होऊन जाते.

लहान मुलं अनुकरणप्रिय असतात. पालक हे मुलांच्या खाण्या-पिण्याच्या, व्यायामाच्या बाबतीतले पहिले आदर्श!.... आई-वडील चुकीचे खाताना दिसले, सतत टी.व्ही/मोबाईलमध्ये व्यस्त दिसले की, मुलं त्यांचं अनुकरण करणार. अनेक पालक विकेंडला आपल्या मुलांना हॉटेलिंगला घेऊन जातात. दोन मिनिटाच्या अंतरावर असलेल्या शाळेत मुलांना गाडीने सोडायला जातात. घरी प्रेमापोटी खायला लावतात. अन्नपदार्थांचा (कॅडबरी, मिठाई) बक्षीस म्हणुन वापर करतात. हे सर्व मुलांच्या वजनाच्या दृष्टीने घातक आहे. हे टाळायला हवे. पालकांनी नियमितपणे मुलांच्या वजनावर लक्ष ठेवले पाहिजे व आवश्यकता वाटल्यास वेळीच तज्ज्ञांचा सल्लाही घेतला पाहिजे.

शाळेत असताना मुलांनी खायला डब्यात काय आणावे याविषयी पालकांना योग्य ते मार्गदर्शन होणं गरजेचं आहे. अनेक शाळांच्या परिसरात वडापाव, समोसे, दाबेली, चिप्स/कुरकुरे इत्यादी पदार्थांचे स्टॉल्स असतात. या सर्व गोष्टी शरीरासाठी कशा हानिकारक असतात, याविषयी वेळोवेळी तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.

स्थूल मुलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. एकविसाव्या शतकात लहान मुलांमध्ये व एकंदरीतच वाढती स्थूलता कमी व्हावी म्हणून विविध सामाजिक संस्थांनी पुढे येऊन याविषयी तज्ज्ञांद्वारे समतोल आहाराविषयी व्याख्याने, मेडिकल चेक अप कॅम्प भरवण्यात पुढाकार घ्यायला हवा.

आजारपणात प्रत्येक स्थूल मुल हे बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांकडेच तपासणी करण्यासाठी जाईल असे नाही आणि त्यामुळे फॅमिली फिजिशियन्सना देखील याविषयी जागरूक करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक स्थूल मुल हे सुपर स्पेशालिस्ट म्हणजेच एन्डोक्रायनॉलॉजिस्ट डॉक्टरांकडे लगेच धाव घेऊ शकत नाही आणि अशा परिस्थितीत बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांची भूमिका महत्त्वाची होऊन जाते. थोडक्यात काय तर, सामूहिक स्तरावर प्रयत्न झाले तर लहान मुलांमध्ये स्थूलता निवारण नक्कीच शक्य आहे. **

# भोंदूगिरीचा मायाबाजार

धनंजय शेटये

एकविसावे शतक हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगतीचे सुवर्णयुग मानले जाते. माणसाने आज मंगळावर स्वारी केली आहे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तो नवनवीन शिखरे पादाक्रांत करत आहे. मात्र, भौतिक प्रगतीच्या या डोळे दीपवणाऱ्या लखलखाटातही समाजाच्या मानसिकतेत दडलेला अंधश्रद्धेचा गडद अंधार अजूनही दूर झालेला नाही. विवेकाचे भान हरपलेली आणि अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली माणसे प्रसंगी निर्जीव दगडाला किंवा गाढवालाही देव मानून त्याची मनोभावे पूजा करायला मागेपुढे पाहत नाहीत, ही आजच्या पुरोगामी आणि आधुनिक समाजाची सर्वांत मोठी शोकांतिका आहे. आजकाल समाजात गल्लोगल्ली तथाकथित 'बाबांचे', 'बुवांचे' आणि 'मातांचे' पेव फुटले असून, अज्ञानाचा हा बाजार राजरोसपणे मांडला गेला आहे.

सर्वांत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी बाब म्हणजे, ही अंधश्रद्धेची कीड केवळ अडाणी किंवा अज्ञानी लोकांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. आजचे उच्चशिक्षित, पांढरपेशी आणि समाजातील अतिप्रतिष्ठित मंडळीसुद्धा या ढोंगी बाबांच्या मठांचे उंबरठे झिजवताना अभिमान बाळगतात. पदव्यांचे भेंडोळे हाती असूनही, संकटाच्या वेळी त्यांची बुद्धी या भोंदूगिरीच्या चरणी कशी गहाण पडते, हे पाहणे आश्चर्यकारक आहे. निसर्गाचे शाश्वत नियम आणि स्वतःचे कर्तृत्व डावलून कोणतीही 'दैवी शक्ती' किंवा 'चमत्कार' आपल्याला रातोरात सुखी करेल, या भाबड्या आशेवर हा सुशिक्षित वर्ग या मायाजालात सहज अडकत चालला आहे. 'शिकले सवरलेले अडाणी' हा वाक्प्रचार आजच्या समाजाला तंतोतंत लागू पडतो. माणसाला या अंधश्रद्धेच्या खोल खाईत लोटणारा त्याचा सर्वांत मोठा शत्रू म्हणजे त्याची 'हताशा'. आयुष्यात जेव्हा संकटांचे दुष्टचक्र माणसाला चारही बाजूंनी घेरते, दुःखाचे डोंगर कोसळतात, तेव्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी तो केविलवाणी धडपड करू लागतो. अशा वेळी कठोर वास्तव, विज्ञान किंवा स्वतःच्या प्रयत्नांवरून त्याचा विश्वास उडतो आणि त्याला 'दैवी चमत्कारांची' आस लागते. निराशेच्या गर्तेत बुडत चाललेले आणि हतबल झालेले मन मग वाट्टेल ते करायला तयार होते. आजूबाजूला आशेचा कोणताही किरण किंवा ठोस पर्याय न दिसल्याने, माणूस सहजपणे या भोंदू बाबांच्या आश्रयाला जातो.



नेमक्या याच मानवी दुबळेपणाचा आणि भावनिक कोंडीचा फायदा हे ढोंगी बाबा अत्यंत शिताफीने उचलतात. माणसाच्या भीतीचे भांडवल करून ते आपला गोरखधंदा चालवतात. त्यांच्या नादाला लागल्यानंतर, निव्वळ योगायोगाने किंवा कर्मधर्मसंयोगाने एखादी गोष्ट जरी सकारात्मक घडली, तरी त्याचा सगळा सार्थ अभिमान हे बाबा स्वतःकडे घेतात आणि त्या हताश व्यक्तीचा अंधविश्वास शंभर पटीने अधिक बळावतो. या अंधश्रद्धेच्या बाजारात सर्वांत किळसवाणा प्रकार पाहायला मिळतो तो राजकारण्यांचा! निवडणुकीच्या रिंगणात उभे असलेले लोकप्रतिनिधी जनतेच्या दारात जाऊन त्यांच्या समस्या समजून घेण्याऐवजी, या भोंदू बाबांची पायधूळ डोक्यावर घेऊनच विजयाची स्वप्ने रंगवत असतात. दुर्दैवाची परिसीमा म्हणजे, ज्या जनतेने त्यांना निवडून दिले, त्यांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करण्याकडे हे नेते सोयीस्करपणे पाठ फिरवतात; मात्र बाबांच्या मठासाठी आणि त्यांच्या ऐशोरामासाठी शासकीय योजनांचा आणि निधीचा अक्षरशः पाऊस पाडतात.

एका बाजूला सामान्य, गरीब माणसाला 'पंतप्रधान आवास योजने'सारख्या हक्काच्या घरासाठी सरकारी बाबूंचे उंबरठे झिजवावे लागतात, भ्रष्टाचाराचा सामना करावा लागतो. तर दुसऱ्या बाजूला, याच ढोंगी बाबांच्या चरणी लाखो-करोडो रुपयांची उधळण करून, त्यांना सर्व सुखसुविधा विनासायास बहाल केल्या जातात. ज्या व्यक्तीचा शिक्षणाशी दुरान्वयेही संबंध नाही, जी आयुष्याच्या परीक्षेत सपशेल नापास झालेली आहे, ती व्यक्ती केवळ लोकांच्या भीतीचा बाजार मांडून अरबपती बनते. आलिशान गाड्या, व्ही.आय.पी. ट्रीटमेंट आणि परदेश वाऱ्यांचा आनंद लुटते. तर दुसरीकडे, उच्च विद्याविभूषित आणि रात्रंदिवस कष्ट करणारा तरुण वर्ग २० ते ३० हजार रुपयांच्या नोकरीसाठी वणवण भटकत असतो. हा सामाजिक विरोधाभास मनाला चटका लावणारा आहे.

कोकणासारख्या निसर्गरम्य आणि सुसंस्कृत भूमीतही देवदेवस्कीचा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रस्थ कमी नाही. अंगात येण्याचे नाटक करून, 'पूर्वीकाळी घराण्यात कोणाच्या तरी हातून चूक झाली,' अशी भीती घालून लोकांची लूट केली जाते. कोकणात सरपटणारे प्राणी मोठ्या प्रमाणावर आढळतात. पूर्वजांकडून चुकून मारल्या गेलेल्या सापाचे निमित्त करून 'सर्पदोष' सांगितला जातो. त्यावर उतारा म्हणून सोन्याचा साप बनवून त्याची पूजा करून जंगलात सोडण्याचा सल्ला हे ढोंगी बाबा देतात. पंधरा-वीस हजारांच्या कोंबड्यांचे बळी दिले जातात. जे बाबा लाखो रुपये घेऊन दुसऱ्यांचे भाग्य उजळवण्याचा दावा करतात, ते स्वतःचे भाग्य का उजळू शकत नाहीत? हा साधा प्रश्न समाजाला पडत नाही.

या भोंदूगिरीला छेद देणारा एक प्रसंग माझ्या वडिलांच्या आयुष्यात घडला. सत्तरीच्या दशकात माझ्या बाबांनी एकदा या ढोंगीपणाविरुद्ध बंड पुकारले होते. अंगात येण्याचे नाटक करणाऱ्या दहा-बारा ढोंगी देवांना त्यांनी 'पेंडकुळणीच्या काठीने' सडकून चोप दिला होता. त्याचे कारणही तसेच होते; बाबांनी मोठ्या कष्टाने भातशेती कापून पेंढे सुकत घातले होते. अंगात आलेले हे खोटे देव मंदिराच्या दिशेने धावत सुटले आणि वाटेत आमच्या सुकत घातलेल्या भातावर नाचत गेले. तेव्हा बाबांचा संयम सुटला आणि त्यांनी या भोंदूगिरीला काठीचा प्रसाद दिला. या घटनेनंतर तत्कालीन समाजाने आमच्या घराला वाळीत टाकले. पण बाबा डगमगले नाहीत, ते शेवटपर्यंत या अंधश्रद्धेच्या विरोधात एकाकी लढत राहिले. आज एवढी वर्षे उलटूनही गावातील देवदेवस्की आणि अंधश्रद्धा जशीच्या तशीच आहे. समाज बदलण्यासाठी जो स्वतःचे रक्त आटवतो, त्यालाच समाज वाळीत टाकतो, हे किती मोठे शल्य आहे!

जोपर्यंत समाज स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करणार नाही आणि संकटांशी दोन हात करण्याची स्वतःची हिंमत जागृत करणार नाही, तोपर्यंत हा भोंदूगिरीचा बाजार असाच तेजीत राहील. डोळ्यांवर बांधलेली अंधश्रद्धेची काळी पट्टी दूर करून, प्रखर विज्ञानाची आणि सत्याची कास धरण्याची आज नितांत गरज आहे. समाज खऱ्या अर्थाने कधी बदलणार? या शोषक अंधश्रद्धेचे समूळ उच्चाटन कधी होणार? हे प्रश्न आज प्रत्येक विचारशील माणसाच्या मनाला अस्वस्थ करत आहेत. चला, विवेकाचा दिवा लावूया आणि या अज्ञानाच्या अंधकाराला कायमचे हद्दपार करूया! **

# माइंडसेट
## व्यक्तिमत्त्व घडविण्याचे अदृश्य कौशल्य

सुनील गवळी

मानवाचे जीवन हे बाह्य परिस्थितीपेक्षा अधिक प्रमाणात त्याच्या मनस्थितीवर अवलंबून असते. आपण स्वतःबद्दल काय विचार करतो, इतरांना काय सांगतो, आणि आपल्या कृतींमधून कोणती प्रतिमा निर्माण करतो यावरच आपल्या व्यक्तिमत्त्वाची आणि समाजातील कीर्तीची उभारणी होत असते. म्हणूनच म्हणतात, ''मन जिंकलं तर जग जिंकलं.''

१. मनाचा आरसा आपण जे विचारतो तेच बनतो

मन म्हणजे एक सुपिक जमीन आहे. त्यात आपण सकारात्मक विचारांची बीजे पेरली तर आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, परिश्रम आणि संयम उगवतात;

पण नकारात्मक विचारांची बीजे पेरली तर न्यूनगंड, आळस, राग आणि चुकीच्या सवयी वाढतात.

उदाहरणार्थ :

एखादी व्यक्ती सतत म्हणते ''मी काहीच करू शकत नाही.''

कालांतराने ती खरंच प्रयत्न करणे थांबवते.

दुसरी व्यक्ती म्हणते ''मी शिकत आहे, मी सुधारत आहे.''

ती हळूहळू यशाच्या दिशेने वाटचाल करते.

म्हणजेच विचार भावना कृती सवय व्यक्तिमत्त्व ही साखळीच जीवन घडवते.

२. स्वतःची प्रतिमा आपणच तयार करतो.

अनेक वेळा आपण जाणीवपूर्वक किंवा नकळत इतरांसमोर स्वतःची एक प्रतिमा तयार करत असतो.

कोणी स्वतःला धार्मिक, सज्जन दाखवण्याचा प्रयत्न करतो.

कोणी स्वतःला बेफिकीर किंवा व्यसनी म्हणून मांडतो.

कोणी ''मी प्रामाणिक आहे'' असे वागून दाखवतो.

ही प्रतिमा फक्त शब्दांनी नाही तर वर्तनातून समाजात पसरते.

जशी सुगंधी फुलांचा सुगंध दूरवर पसरतो, तशीच व्यक्तीची वृत्तीही परिसरावर परिणाम करते.

३. मुलांवर आणि समाजावर माइंडसेटचा परिणाम

मुलं आपण सांगतो ते कमी आणि आपण करतो ते जास्त शिकतात.

जर घरात सकारात्मक संवाद असेल, परिश्रमाची सवय असेल, वाचन, शिस्त, आदर यांचे वातावरण असेल, तर मुलंही तेच आत्मसात करतात.

परंतु नकारात्मक बोलणे, दोषारोप, व्यसन किंवा निरुत्साह असल्यास मुलांच्या मनात असुरक्षितता आणि दिशाभ्रम निर्माण होतो.म्हणूनच पालक आणि शिक्षक हे मुलांच्या माइंडसेटचे पहिले शिल्पकार असतात.

४. जसं पाहतो तसं घडतो

मानवाची एक विलक्षण क्षमता म्हणजे कल्पनाशक्ती.

खेळाडू सामना खेळण्यापूर्वी विजयाची कल्पना करतो.

विद्यार्थी यशस्वी होण्याची प्रतिमा मनात उभी करतो.

शिक्षक आदर्श विद्यार्थी घडवण्याचे चित्र मनात ठेवतो.



यालाच म्हणतात.

मनात जे चित्र वारंवार उभं राहते, तेच आपल्या कृतींना दिशा देतं.

५. शिक्षक आणि पालकांची भूमिका समाजनिर्मितीची गुरुकिल्ली

एक चांगला शिक्षक फक्त विषय शिकवत नाही, तो विचार करण्याची पद्धत शिकवतो.

एक सजग पालक फक्त मुलांना वाढवत नाही, तो मूल्ये रुजवतो.

जर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले चुका करायला हरकत नाही, पण शिकायला हवं. स्पर्धेपेक्षा प्रगती महत्त्वाची प्रामाणिकपणा हा सर्वात मोठा गुण. तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. यातूनच तयार होतो सजग नागरिक, सुसंस्कृत समाज, सक्षम राष्ट्र.

६. तात्विक दृष्टिकोन

भारतीय चिंतनपरंपरेत मनाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे.

मनच बंधन आणि मनच मुक्तीचे कारण आहे.

विचार शुद्ध तर जीवन शुद्ध.

बाह्य बदलांपेक्षा अंतर्मनाचा बदल अधिक प्रभावी.

म्हणूनच व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे बाह्य सजावट नव्हे, तर आंतरिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

७. सकारात्मक माइंडसेट घडविण्याचे काही व्यवहार्य उपाय

१. दररोज स्वतःशी सकारात्मक संवाद साधा.

२. तुलना टाळा प्रगतीवर लक्ष केंद्रित करा.

३. चांगल्या सवयींचा छोटा पण सातत्यपूर्ण सराव करा.

४. मुलांसमोर आपणच आदर्श बना.

५. अपयशाला शिकण्याची संधी म्हणून स्वीकारा.

६. कृतज्ञता आणि शिस्त या दोन मूल्यांचा अंगीकार करा.

७. समाज बदलायचा असेल तर योजना बदलून उपयोग नाही, मन बदलावे लागते.

प्रत्येक पालक, शिक्षक आणि व्यक्ती जर स्वतःचा माइंडसेट सकारात्मक, विधायक आणि मूल्याधिष्ठित केला, तर आपोआपच चांगल्या व्यक्तिमत्त्वांची निर्मिती होईल.

कारण ''समाज हा वेगळा नसतो; तो आपल्या विचारांचेच प्रतिबिंब असतो.'' **

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| RGD/016/2026-28



### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ मार्च

१) श्री. नवीनचंद्र भारमल शाह वेश्वी, अलिबाग, २९-३-१९४८
२) श्रीम. मंजिरी मोहन शेंड्ये अलिबाग, २९-३-१९५३
३) श्रीम. विजया गणेश पाटील मापगाव, अलिबाग, २९-३-१९४९
४) श्री. रविकांत विठ्ठल मेहता अलिबाग, २९-३-१९५७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



प्रेमजी जिवराज जैन, वाढदिवस अलिबाग

### विद्यार्थ्यांचा सत्कार

**चिरनेर :** श्रावणी सोमवार आरती समूह व सुयश क्लासेसच्या संयुक्त विद्यमाने भोलेनाथ मंदिर आवरे येथे दहावी तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील बारावीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

# वणव्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## • कडधान्य आगीमध्ये जळून खाक • स्थानिक शेतकरी हवालदिल

**। महाड । प्रतिनिधी ।**

उन्हाळ्याच्या झळा तीव्र जाणवू लागल्या असून, सद्या पारा ४० च्या आसपास पोहचत आहे. या उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये महाड तालुक्यातील तेलंगे गावा लगत वणव्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी चिंतेत सापडले आहेत. वाढत्या वणव्यांमुळे जंगलाजवळील शेती, फळबागा आणि पिकांचे, पशु, पक्षी यांचे अतोनात नुकसान होत असल्याचे पाहायला मिळत आहे. दिवसेंदिवस वणव्याच्या घटनामध्ये वाढ होताना पाहायला मिळत आहे.



भर रखरखत्या उन्हाच्या दरम्यान दुपारी साडे तीन वाजताच्या सुमारास तेलंगे तेलगाटी येथे वणव्याच्या लागलेल्या आगीमुळे तेलंगे तसेच ओवळे गावातील पीक कसत असणारे शेतकरी दशरथ निंबरे, विजय निंबरे, नलिनी भावे, संजय भावे यांच्या तूर पिकाचे तसेच, अनंत गोरे, तुकाराम कोबनाक, शंकर येळकर, तुकाराम चिमण, मानसी पवार पावटा, उडीद पिकाचे, शेवंती आग्रे, सुभाष मालप, संदेश मनवे, शिवाजी मालप यांच्या तूर, पावटा, कुळीद पिकाचे, तर भागवत शिंदे, नामदेव मोरे यांच्या तूर, पावटा पिकाचे, तसेच नामदेव मोरे यांच्या तूर, पावटा, चवळी, कुळीद पिकाचे, गुलाम गफूर जेटाम, जफर जेटाम यांच्या तूर, पावटा, कुळीद आणि चवळी कडधान्याचे वणव्याच्या अगीमध्ये जळून नुकसान झाले आहे.

दरम्यान, शेतातील पावटा, तूर, आवरा, कुळीद, उडीद उत्पादन घेण्यात आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हाताजवळ तोंडाशी आलेला घास हिरावून नेला गेल्याची स्थानिक शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

आग विझवण्यासाठी स्थानिकांनी प्रयत्न केला असता आग भयानक होती, आग विजवणे शक्य झाले नाही. या आगीमध्ये तेलंगे, तेलंगे मोहल्ला आणि ओवळे येथील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

> “झालेल्या नुकसानकडे प्रशासनाचे अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी मदतीचा हात द्यावा अशी जनमानसातली इच्छा प्रकट होत असून वनविभागाने उपाय योजना कराव्यात आणि वणवा लावणाऱ्या व्यक्तीवर कठोर करावाई करावी.”
> – विनायक येलकर, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत तेलंगे

प्रशासनाने घटनेची दखल घेतली असून मंडळ अधिकारी तुडील वनिता शिंदे, ग्राम महसूल अधिकारी तलाठी तेलंगे अमोल चव्हाण आणि संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.




## रमेश पिंगळे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची माध्यमिक शाळा जांबरुंग कर्जत येथील मुख्याध्यापक रमेश पिंगळे यांच्या सेवापूर्तीनिमित्त संस्थेच्या वतीने शाळेत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

पिंगळे यांनी शाळेसाठी दिलेल्या दीर्घकालीन आणि समर्पीत सेवेस सर्वांनीच उच्च शब्दांत कौतुक केले. शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करत पिंगळेंविषयी गौरवोद्गार काढले.यावेळी संस्थेचे मानव संसाधन विभागाचे विक्रांत वार्डे यांनी पिंगळे यांनी २३ वर्षे शाळा आणि संस्थेला निःस्वार्थ सेवा दिली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज समाजात प्रतिमा उंचावताना दिसत असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास अरुण मेदगे, संदेश सावंत, कैलास बांगर, ज्योत्स्ना मेदगे, छगन कोकणे, भरत बिबवे, निलेश मेदगे, सुरेश बिबवे, जनार्दन घुडे, भगत, पवन मेदगे, अशोक मेदगे, राहुल वरखडे, मनिष कोकणे, भावेश थरकूडे प्रा. निशिकांत कोळसे, प्रा. दिनेश पाटील, प्रा. तेजस म्हात्रे, पिंगळे त्यांच्या पत्नी सुवर्ण पिंगळे, ओंकार पिंगळे, अक्षदा पिंगळे हे देखील उपस्थित होते. तसेच पीएनपी माध्यमिक शाळा जांबरुंगचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# डबक्यातील पाणी पिऊन गुरांची तृष्णा शांत

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

पाणी हे जीवन असे म्हटले आहे. मात्र, गेली सात ते आठ वर्षापासून कालवे बंद पडल्यामुळे गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येत चालला आहे. शेतकऱ्यांची गुरे व मोकाट गुरे, या कालव्यावर आपली कृष्णा शांत करत होते. मात्र, कालवे बंद पडल्यामुळे शेतकरी वर्गांसाठी व आपल्या गुरांसाठी पाण्याचे टंचाई निर्माण होत असल्यामुळे अनेक समस्या निर्माण होते. यामुळे मिळेल ते पाणी पिऊन आपली तृष्णा शांत करीत असल्याचे दृश्य अनेक ठिकाणी पहावयास मिळत आहे.



खरसुंडी येथील बंधारातून हे पाणी कालव्याच्या माध्यमातून पौध, माजगाव, आंबिवली, वारद या गावापर्यंत हे पाणी पोहोचले जात होते. मात्र कालव्याची दुरावस्था होत असल्यामुळे हा कालवा बंद करण्यात आला. मात्र याचाच फटका शेतकऱ्यांजवळ असलेल्या गुरांना बसला आहे. पूर्वी कालव्याला पाणी येत असल्यामुळे येथील परिसर हिरवळ, निर्माण होत असून हेच गुरांसाठी त्यांचे खाद्य निर्माण होत. त्याचबरोबर पिण्यासाठी मुबलक पाणी मिळत होते.मात्र कालवा बंद झाल्यामुळे मिळेल ते पाणी पिऊन गुरे आपली तृष्णा शांत करत असल्याचे दृश्य पहावयास मिळत आहे.

ग्रामीण भागात शेतकरी गुरे सांभाळ करीत असतात, शेतीच्या कामासाठी तसे दुग्ध व्यवसायासाठी उपयोग होत असून, शेतकरी वर्गांचा सांभाळ करीत असतात. मात्र, रणरणत्या उन्हामुळे पाण्याच्या असलेले स्तोत्र तळ गाठत असल्यामुळे गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येत चालला आहे. मात्र, या कालव्याला पाणी आल्यास गुरांचा व शेतीचा फार महत्वाचे ठरले जाणारे आहे.असे बोलले जात आहे. पिण्यासाठी मुबलक पाणी मिळत नसल्यामुळे रस्त्यावर जमा झालेले पाणी, अथवा डबक्यातील पाणी पिऊन आपली तृष्णा शांत करीत असलेले दृश्य पहावयास मिळत आहे.




# पथनाट्यातून शासकीय योजनांचा जागर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग, जिल्हा नियोजन कार्यालय, रायगड, अलिबाग जिल्हा माहिती कार्यालय, रायगड यांच्या माध्यमातून आयोजित पथनाट्यातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था, रोहा यांच्यावतीने अलिबाग बस स्थानक, अलिबाग समुद्रकिनारा, बामणगाव अशा विविध गावांमध्ये करण्यात आली.

यावेळी नागरिकांना बेटी बचाव बेटी पढाओ, माझी कन्या भाग्यश्री, मुद्रा लोन योजना, कौशल्य विकास योजना, घरकुल योजना अशा विविध योजनांची माहिती कलाकारांनी दिली. पथनाट्याचे नेतृत्व तपस्वी गोंधळी यांनी केले. पथनाट्यात कलाकार म्हणून सुचित जावरे, कोमल परब, अंजली पेडणेकर, वैष्णवी पाटील, सायली ठाकूर, जान्हवी ठाकूर, महिमा शिपाई, तन्वी कदम आदी सहभागी झाले होते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २९ मार्च ते ०४ एप्रिल २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत कर्तव्यदक्ष राहिल्यास आपणास आगळेवेगळे समाधान मिळू शकेल. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची दक्षता घ्या. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील. प्रवासाचे योग येतील. आपल्या ओळखींचा योग्य ठिकाणी वापर करा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नवीन गोष्टी करण्याचा आपला मानस राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. स्थावरसंबंधीचे प्रश्न सोडवू शकाल. डोकेदुखी व डोळ्यांची जळजळ या विकारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. आपला उत्साह वृद्धिंगत झाल्यामुळे या सप्ताहात पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. आपल्या करिअरमध्ये प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **महिलांना :** आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा म्हणजे गैरसमज पसरणार नाही. नव्या व्यक्तीच्या गाठीभेटीचा लाभ घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. प्रवास कराल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक :** २९,३०

## अनपेक्षित खर्च वाढणार

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता प्रत्येक बाबतीत आपण सावधगिरीने वागल्यास अपेक्षित गोष्टी साध्य होणे शक्य आहे. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. कामानिमित्त अचानक प्रवासाचे योग संभवतात. अनपेक्षित खर्च वाढण्याची शक्यता आहे. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. स्थावर-जंगमबाबतचे प्रश्न सुटू शकतील. वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवा. विविध क्षेत्रांत आपण प्रगतीची वाटचाल करू शकाल. स्थावरबाबतीतील प्रश्न सुटू शकतील. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने अनावश्यक खर्च टाळा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या, विशेषतः पत्नीला खूश ठेवा. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची दक्षता घ्या. प्रकृतीमान ठीक असले तरी मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **महिलांना :** कौटुंबिक जीवनात मतभेदाचे प्रसंग येणार नाही याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू सावरता येईल. विवाहइच्छुकांना त्यांच्या स्वप्नपूर्तीची संधी मिळेल. अपचनासारख्या विकारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ३०,३१

## व्यवहारात सावधानता बाळगा

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता आपण अनुकूल वातावरणाचा लाभ घेऊन कार्य साध्य करू शकाल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. सरकार दप्तरी रखडलेली कामे पार पाडता येतील. कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना उत्तम वाव मिळेल. प्रवासाचे योग येतील. हितशत्रूंच्या कारवायांवर नजर ठेवा. आर्थिक बाजू सुधारेल. स्थावर-जंगमच्या बाबतीतील प्रश्न सोडविता येतील. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आरोग्याची काळजी घ्या. आहार-विहारावर नियंत्रण आवश्यक राहील. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. हा आठवडा सर्व दृष्टीने उत्तम राहिल्याने कामाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. विरोधकांना काबूत ठेवण्याचा प्रयत्न करा. कामाचा व्याप वाढणार आहे, त्याचा परिणाम प्रकृतीवर होणार नाही याची काळजी घ्या. **महिलांना :** आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. विद्यार्थीवर्गाला परिश्रमा शिवाय पर्याय नाही. प्रकृती जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०२,०३

## प्रलोभनांपासून दूर राहा

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता आपणास सर्व कार्यात सुलभता जाणवेल व समाधान मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावरबाबतीतील समस्या सोडविता येतील. कोर्ट कचेरीच्या कामांना चालना मिळेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार होण्याची संधी मिळू शकते. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ छान राहील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनातील परिश्रम वाढविल्यास त्यांना दिलासा मिळू शकेल. मतभेदाचे प्रसंग युक्तीने हाताळा. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या आजारपणासाठी खर्च संभवतो. कामाचे वेळापत्रक सांभाळा. प्रलोभनांपासून दूर राहा. आठवड्याच्या सुरुवातीला काहीशा अडचणी आल्या तरी नंतरचा काळ चांगला राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावरबाबतचे प्रश्नमार्गी लागतील. विवाह इच्छुकांना जोडीदाराची साथ मिळू शकेल. **महिलांना :** कौटुंबिक प्रश्न उद्भवण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने यशासाठी मेहनत वाढवावी. प्रवासाचे योग येतील. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, अपचनाच्या विकारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** २९, ०३

## कामाचा व्याप वाढणार

**सिंह :** आपले ग्रहमान पाहता या सप्ताहात बहुतांश गोष्टी आपल्या मनासारख्या होतील व त्याचा आनंद घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम काळ असून महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवास योग येतील. सरकारी नियम व कायदा यांचे पालन करा. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. घरगुती वातावरण बिघडणार नाही याची दक्षता घ्या. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. कामाचा व्याप वाढणार आहे. मोसमी आजारांपासून सावध राहा. या सप्ताहात वेगळ्या प्रकारच्या समस्यांना आपणास सामोरे जावे लागणार असून, त्यातून मार्ग काढावा लागणार आहे. सरकारी नियमांचे पालन करा. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ छान असून, काही नव्या जबाबदाऱ्या पडण्याची शक्यता आहे. **महिलांना :** आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. मुलांकडे अधिक लक्ष द्या. प्रकृतीच्या कुरुबुरी उद्भवण्याची शक्यता आहे, अपचनाच्या विकारांपासून जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, विश्रांती घ्या. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०१,०४

## आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील

**कन्या :** आपले ग्रहमान पाहता आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. स्थावरबाबतीतील प्रश्नांची उकल करता येईल. कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. प्रवास योग संभवतात, मात्र, प्रवासात सावधानता बाळगावी. आर्थिक बाजू ठीक राहील. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. आपल्या काम काजात अधिक लक्ष देऊन आपले उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करा. प्रकृतीची काळजी घ्या, उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. प्रवासाचे योग येतील. कलाकारांना मान सन्मानाचा योग आहे. एखादी नवी ऑफर आली तर पूर्ण तपासून घ्या. आंधळा विश्वास घातक ठरू शकतो. **महिलांना :** आपणावर विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या (प्रामुख्याने कामकाज, कौटुंबिक प्रश्न) पडण्याची शक्यता आहे. कोणताही निर्णय घेताना विचारपूर्वक घ्या. प्रवासात आपली पर्स सांभाळा, प्रकृतीबाबतच्या तक्रारी उद्भवण्याची शक्यता राहील. विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावधानता बाळगा. आर्थिक बाजू ठीक राहील. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. एखादी मनासारखी वस्तू भेट मिळू शकते. **शुभ दिनांक :** ०२,०३

## हिशोबी राहणे आवश्यक

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आर्थिक स्रोतात बऱ्यापैकी भर पडण्याची शक्यता राहील. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. प्रवास सावधपणे करा. स्थावरबाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. नवनवीन तंत्राचा लाभ घेता येईल. एखाद्या व्यक्तीचा मदतीचा हात मिळण्याची शक्यता आहे. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या, पोटाच्या विकारांबाबत सावध राहा. आपण यावेळी काम काजात व्यस्त राहाल व धावपळ वाढेल. व्यापार-उद्योगात प्रगती साधता येईल. स्थावर मालमत्ता, बांधकाम व्यवसाय, शेती अशा क्षेत्रांतील व्यक्तींना चांगला काळ राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. क्रीडा व व्यवसाइक क्षेत्रातील मंडळींना उत्तम काळ राहील. प्रवासाचे य़ोग येतील. **महिलांना :** आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. प्रकृतीची काळजी घ्या, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. कंबरदुखी, पोटाच्या तक्रारी यापासून सावध राहा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. जोडीदाराशी सामंजस्याने वागा. जोडीदाराशी जुळवून घ्या. त्याचे मन सांभाळा. **शुभ दिनांक :** ०१,०२

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**वृश्चिक :** या सप्ताहात आपण घेत असलेल्या मेहनतीचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. स्थावरबाबतीतले प्रश्न लांबणीवर टाका. आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल. आपली लोकप्रियता वृद्धिंगत होईल. खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा. तुमचे करिअर नव्या टप्प्यावर नेण्याची आपली धारणा राहील. आप्तेष्टांशी नाती सामंजस्याने जपा. प्रवास कराल. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. हितशत्रूंना त्यांची जागा दाखवण्याची संधी मिळेल. नियमित व्यायाम करा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. जोडीदाराशी जुळवून घ्या. बहुतांश गोष्टींच्या अपेक्षापूर्तीचा आपण आनंद घेऊ शकाल. मित्रमंडळींच्या गाठीभेटी होण्याची शक्यता आहे. स्थावर मालमत्तेबाबतचे प्रश्न सोडविता येतील. काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. आपल्या कार्यात चुका होणार नाही याची दक्षता घ्या. कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्या. **महिलांनाः** मुलांच्या प्रश्नांना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः डोळे, खांदे, मान दुखण्याची शक्यता संभवते, तरी जपा. जोडीदाराशी जुळवून घ्या. **शुभ दिनांक :** ०३,०४

## तडजोडीची भूमिका घ्या

**धनु :** आपले ग्रहमान पाहता हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल व त्याचे समाधान मिळेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम वाव मिळेल. त्यांच्या कलागुणांना चांगला प्रतिसाद मिळेल. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाही याची काळजी घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. क्रीडा, तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना हा काळ छान राहील. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. विरोधक गप्प बसतील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. या सप्ताहात आपणास बहुतांश अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. स्थावर मालमत्तेचे प्रश्न सोडविता येतील. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. कामानिमित्त प्रवास कराल. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. मुलांच्या प्रश्नांना सामोरे जा. आर्थिक बाजू ठीक राहील. क्रीडा, तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना भरपूर वाव मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, जुने आजार डोके वर काढण्याची शक्यता आहे. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** २९,३१

## प्रवासात सावधानता बाळगा

**मकर :** ग्रहमान पाहता आपण अडचणीच्या पर्वातून प्रवास करीत आहात, हे विसरू नका. कुठल्याही बाबतीत गाफील राहू नका. या आठवड्याचा संदेश आहे. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. कामानिमित्त प्रवास योग संभवतात. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढवावे. कौटुंबिक वातावरण लहान-सहान वादाच्या प्रसंगांनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. हितशत्रूंच्या कारवायांवर नजर ठेवा. प्रत्येक काम धैर्य व शांतीने करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा, दंतविकारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. आपल्या कौटुंबिक प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविण्याचा प्रयत्न केल्यास खरे समाधान मिळेल. कामानिमित्त प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना :** घरगुती वातावरण वादासारख्या गोष्टींनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. मुलांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करा. प्रवासात सावधानता बाळगा. एखाद्या खास व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ३०,०२

## धार्मिक कार्यात सहभागी व्हा

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता आपण जिद्द व संयमाने प्रत्येक गोष्ट करण्याची तयारी ठेवल्यास यशाचा मार्ग सुलभ होईल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. आप्तेष्टांशी, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे आवश्यक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. मुलांच्या भवितव्याचा विचार करा. आर्थिक बाजू ठीक राहील. धार्मिक कार्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. भावी काळासाठी योग्य गुंतवणूक करा. दूरच्या नातलगांच्या संपर्कात राहाल. मोसमी आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. तरीही आठवडा सर्वसाधारण स्वरूपाचा जाण्याची शक्यता आहे. दूरच्या मंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रवासाचे योग संभवतात. व्यवसाय क्षेत्रात, विशेषतः मार्केटिंग, सेल्स, कम्युनिकेशन आदी क्षेत्रांतील व्यक्तींना लाभदायक काळ राहील. धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळेल. **महिलांना :** घरगुती वातावरण छान ठेवण्याचा प्रयत्न करा. आप्तेष्टांशी सौदार्याने वागणे इष्ट राहील. एखादी इच्छा पूर्ण होईल. मात्र प्रकृती जपा, विशेषतः पोटात जळजळ, डोकेदुखीच्या आजारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०३,०४

## नव्या ओळखी होतील

**मीन :** आपले ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण दैनंदिन कामकाजात व्यस्त राहाल. कामकाजात गाफील न राहता चाणाक्षपणे कामे केल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने यशदायी जाऊ शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. कलाक्षेत्राला चांगला काळ असून, महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. स्थावरबाबतीतील प्रश्न सोडविता येतील. व्यावसायिक जीवनात एखाद्या स्पर्धेला सामोरे जावे लागण्याची शक्यता राहील. मार्केटिंग क्षेत्राला उत्तम काळ राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. व्यवसायाला चालना मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत जागरूक राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. वाहनांच्या वेगावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना :** कौटुंबिक गोष्टींना व कर्तव्याला प्राधान्य द्या. प्रवासाचे योग येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. सर्वांशी नम्रतेने वागणे ठीक राहील. आग व पाणी याची दक्षता घ्या, विशेषतः स्वयंपाक करताना चित्त विचलित होऊ देऊ नका. मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. **शुभ दिनांक :** ०१, ०२

## चित्रलेखा पाटील पुरस्कृत, कृषीवल आयोजित

# भव्य महिला क्रिकेट स्पर्धा जल्लोषात







। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सक्षम व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने दैनिक कृषीवलने नागावमधील सायरस पुनावाला स्कूलच्या मैदानात शुक्रवारी (दि.२७) नागाव-आक्षी महिला प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. कृषीवलने उचललेले हे पाऊल केवळ क्रीडा स्पर्धेपुरते मर्यादित न राहता, महिला सक्षमीकरणाच्या चळवळीला नवे बळ देणारे ठरले आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या पुरस्कारातून आणि कृषीवल संपादक माधवी सावंत, ॲड. नम्रता नाईक, ॲड. मंजिरी सावंत यांच्या दूरदृष्टीतून साकारलेल्या या स्पर्धेने जिल्ह्यात एक वेगळाच उत्साह निर्माण केला.

नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहकार्यामुळे या भव्य स्पर्धेचे यशस्वी आयोजन शक्य झाले. या नागाव-आक्षी महिला प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन अलिबाग नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते पार पडले. या स्पर्धेत नागाव व आक्षी गावांतील महिला संघांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली क्रीडाप्रतिभा दाखवून दिली. पारंपरिक चौकटीबाहेर पडत महिलांनी मैदानात उतरून जिद्द, संघभावना आणि आत्मविश्वासाचा उत्कृष्ट नमुना सादर केला. प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली चुरस, प्रेक्षकांनी दिलेला भरभरून प्रतिसाद आणि मैदानावर निर्माण झालेला जल्लोष यामुळे संपूर्ण परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.

स्पर्धेत आक्षी व नागाव परिसरातील एकूण दहा संघांनी सहभाग घेतला होता. त्यात स्वराज्य आक्षी, नागाव जीम, साईसेवक आक्षी, श्रीगणेश कोठारभाट, शिव बाप्पा महिला मंडळ, दर्यावर्दी वॉरियर्स, सहेली गृप, सायरस पुनावाला स्कुल, मरीआई हटाळे व शास्त्रीनगर या महिला संघांचा समावेश होता. या स्पर्धेतील अंतिम सामना श्रीगणेश कोठारभाट व सायरस पुनावाला स्कुल यांच्यात झाला. या अतितटीच्या सामन्यात कोटारभाट संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण घेतले. त्यामुळे सायरस पुनावाला संघाला प्रथम फलंदाजीची संधी मिळाली. त्यांनी मर्यादित सहा षटकांत ३५ धावसंख्या उभारली. त्यानंतर सायरस पुनावाला संघाने दिलेले लक्ष श्रीगणेश कोटारभाट संघाने अवघ्या ४ षटकांत पुर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे सायरस पुनावाला स्कुलला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. तर, स्वराज्य आक्षी संघाने तृतीय क्रमांक पटकावला. त्याचबरोबर या स्पर्धेतील मालिकावीर म्हणून सायरस पुनावाला संघातील सोनाली पाटील या ठरल्या. तसेच, उत्कृष्ट फलंदाज आणि सामनावीर म्हणून कृषीवलच्या संपादक माधवी सावंत या ठरल्या. तर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून स्वराज्य आक्षी संघातील तनू यांनी बहूमान मिळविला.

दरम्यान, स्थानिक पातळीवर महिलांना मिळालेल्या या संधीमुळे त्यांच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली असून, भविष्यात अशा उपक्रमांमुळे अधिकाधिक महिला क्रीडा क्षेत्रात पुढे येतील, अशी आशा व्यक्त होत आहे. कृषीवलचे सहयोगी संपादक सुयोग आंग्रे, वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार, उपसंपादक संतोष राऊळ, कला संपादक केदार गुरव, वैष्णवी वाडकर यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच, पंच म्हणून नितिन सारंग, सुयोग चोगले आणि आयुष चोगले यांनी चोख कामगिरी बजावली.

यावेळी नागाव उपसरपंच मंगला नागे, सदस्य प्रियंका काठे, निकिता पाडेकरी, आक्षी सदस्य निरजा नाईक, रविंद्र पाटील यांच्यासह क्रिकेटप्रेमी आदींच्या उपस्थितीतील ही स्पर्धा केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता, महिलांच्या हक्क, क्षमता आणि स्वाभिमानाला बळ देणारा एक प्रभावी मंच ठरली आहे. कृषीवलने घेतलेला हा उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवणारा ठरत असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी मानले जात आहे.

कृषीवल

---

विनायक दळवी

## आयपीएल २०२६ चे बिगुल वाजले

यंदाच्या आयपीएल स्पर्धेचे बिगुल बंगळूर येथे शनिवार (दि.२८) मार्चला वाजले आहे. ३१ मे पर्यंत चालणाऱ्या जगातील या सर्वात श्रीमंत, महागड्या आणि अतिशय लोकप्रिय ठरलेल्या या लीगमध्ये भारतातील आणि जगातील सर्व नामवंत खेळाडू खेळत आहेत. रथी महारथी खेळाडू आणि दिग्गज कर्णधार संघात असतानाही गेल्या १८ वर्षांच्या आयपीएल स्पर्धेत यश मिळवू न शकलेल्या बंगळूर संघाने गत हंगामात मात्र, सर्वोत्तम खेळ करत आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का देत आयपीएल स्पर्धा जिंकली होती. संघात विश्वविजेते, वेगवान शतक ठोकणारे फलंदाज, उत्तम गोलंदाज असतानाही बंगळूर संघ का जिंकत नाही हा प्रश्न सातत्याने विचारला जायचा. यानंतर मात्र, हा प्रश्न आता विचारला जाणार नाही. गत स्पर्धेत एकीकडे अठरा वर्षानंतर विजेतेपद मिळवण्याचा आनंद साजरा करीत असतानाच क्रिकेटच्या इतिहासातील एक दुर्दैवी घटना आरसीबीच्या विजेतेपदानंतर काही तासातच घडली. १८ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मिळालेल्या या विजयाचा जल्लोष अवघ्या १८ तासांपुरताच मर्यादित राहिला. ४ जून रोजी चिन्नास्वामी स्टेडियमच्या प्रवेशद्वाराबाहेर घडलेल्या भीषण शोकांतिकेच्या पार्श्वभूमीवर, क्रिकेटचे महत्त्व अगदीच नगण्य ठरले. ज्या क्षणाने संपूर्ण बंगळूर शहराला आनंदाने एकजूट करायला हवे होते, त्याच क्षणाने मात्र ११ जणांचा बळी घेतला आणि संपूर्ण शहराला शोक व संतापाच्या गर्तेत लोटले. या घटनेनंतरच्या कालखंडात, विशेषतः आरसीबी आणि इतर संबंधितासांसाठी केवळ कायदेशीर प्रक्रिया, एकमेकांवर दोषारोपण आणि आपली प्रतिष्ठा वाचवण्याचे प्रयत्न या गोष्टीच प्रामुख्याने घडत राहिल्या. खेळाडू आणि प्रशिक्षक वर्गासाठी मात्र, मैदानावर मिळवलेल्या विजयांचा तो हंगाम कधीच मनापासून साजरा करता आला नाही. रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली आरसीबी संघ विजेता ठरला तरी देखील या संघाचा प्रमुख आकर्षण विराट कोहली भारताचा माजी कप्तान आणि जगातील एक सर्वोत्तम फलंदाज असेल. आरसीबीला यंदापासून पुन्हा एकदा नव्याने सुरुवात करावी लागणार आहे. या वर्षीची स्पर्धा एकूण १३ शहरांमध्ये खेळवली जाणार असून एकूण ८४ सामने होण्याची शक्यता आहे.

इराण-इजरायल युद्धाचे सावट या स्पर्धेवर असले, तरीदेखील भारतीय क्रीडारसिकांच्या उत्साहावर जरा देखील परिणाम झालेला दिसत नाही. कारण सर्व सामान्यांच्या तिकिटासाठी सातत्याने विचारणा होत आहे. भारतीय क्रीडा क्रिकेट रसिकांसाठी यंदाची आयपीएस स्पर्धा म्हणजे आणखी एक वेगळ्या कारणासाठी औसुक्याची असेल. आयपीएलच्या इतिहासात स्पर्धेतील सर्वच्या सर्व म्हणजे दहाही संघांचे कप्तान भारतीय आहेत. याआधी असे कधीच घडलेले नव्हते. २८ मार्चपासून सुरू झालेली ही स्पर्धा ३१ मे पर्यंत चालेल. भारतातील उष्ण हवामानात देखील ज्या दिवशी दोन सामने आहेत, त्या दिवशीचा एक सामना दिवसा असेल. त्याशिवाय ज्या शहरांमध्ये आयपीएलचे सामने आयोजित होत नाहीत त्या शहरांमध्ये मैदानांमध्ये मोठे स्क्रीन लावून लाईव्ह क्रिकेट सामने पाहण्याची रचना करण्यात आली आहे. त्याला देखील प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

परंपरेप्रमाणे यावेळी देखील आयपीएलने काही नव्या नियमांची घोषणा केली आहे.खेळाडूंना स्लीव्हलेस जर्सी वापरता येणार नाही आणि टीम बसनेच प्रवास करणे अनिवार्य असेल. मागील अनुभवावरून हा निर्णय घेण्यात आला आहे. ही क्रिकेट स्पर्धा क्रिकेटच्या गुणवत्तेपेक्षा भारतातील शाळांना सुट्टी झाल्यानंतरचा सुट्टीचा हंगाम पाहता लोकप्रिय ठरली आहे. परीक्षेचा ताण व क्षीण घालवण्यासाठी युवा पिढीला त्यांच्या पालकांनी दिलेलं आयपीएल सामना दाखविण्याचे वचन पळताना, पालकांची झालेली त्रेधातिरपीट किंवा अगतिकता देखील, यावेळी लक्षात येत आहे. प्रत्येक यजमानाने या सामन्याची तिकिटे विकण्याचे अधिकार स्वतःकडेच ठेवले आहेत असोसिएशन आणि त्यांच्या संलग्न क्लब यांना मिळणारी मोजकीच किंवा तुटपुंजी तिकिटे, सर्व क्रिकेट रसिकांची मागणी पूर्ण करू शकत नाही. तरी देखील टेलिव्हिजनवर सामने पाहून किंवा फॅन क्लबच्या माध्यमातून या क्रिकेटचा आनंद भारतीय क्रिकेट रसिक यावेळी निश्चित लुटतील, यात शंका नाही.




---

## खुशीला तांग-सू-डो स्पर्धेत रौप्यपदक

। कोर्लई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे),जिल्हा क्रीडा परिषद बुलढाणा व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या विद्यमाने तांग सू डो स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि तेंग- सू- डो स्पोर्ट्स असोसिएशन नांदुरा, जिल्हा बुलढाणा यांच्या सहकार्याने दि.२४ व २५ मार्च २०२६ रोजी राज्यस्तरीय शालेय तांग सू डो स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. यात राज्यातील आठ विभागातील २५० पेक्षा जास्त खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.

सदर स्पर्धेत मुंबई विभागाने चमकदार कामगिरी करत सर्वाधिक १७ सुवर्णपदक, ५ रौप्यपदक व १ कांस्यपदक पटकावत प्रथम ठरला तर खुशी सर्वेश शेट्ये हिने दमदार कामगिरी करून रौप्यपदक पटकावले.



रिलायन्स फाउंडेशन स्कूल, लोधीवलीची विद्यार्थिनी खुशी सर्वेश शेट्ये हिने क्रमशः शालेय जिल्हास्तर व मुंबई विभागीय निवड चाचणीत प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेकरीता आपले स्थान निश्चित केले तसेच नांदुरा येथे ही राज्यस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करून रौप्यपदक पटकावले. खुशी हिला मास्टर विजय तांबडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षक अभिषेक तांबडकर व स्वप्ना तांबडकर यांनी प्रशिक्षण दिले. तसेच मुख्याध्यापक धीरेंद्र हरबोला व क्रीडा प्रशिक्षक अजय पाटील यांनी विशेष प्रोत्साहन दिले. खुशीने मिळविलेल्या यशाबद्दल जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी तसेच रिलायन्स फाउंडेशन शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून जिल्ह्यातून सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## शूटिंगबॉल स्पर्धेत मालेगाव विजयी

। मुंबई । प्रतिनिधी ।

भायखळ्यातील मुंबई अग्निशमन मुख्यालयात रंगलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय शूटिंगबॉल स्पर्धेच्या निमित्ताने मालेगाव शूटिंगबॉल शो रंगला. इस्तियाक मालेगाव संघाने अचूक खेळाचा नमुना सादर करत विजेतेपदावर झेंडा रोवला. किशोर घाडीगावकर स्मृतिचषकासाठी मुंबईच्या अग्निशमन सेवा कला व क्रीडा मंच आणि मुंबई शूटिंगबॉल संघटनेने आयोजित स्पर्धेत मालेगावच्या इस्तियाक संघ आणि आयएससी संघात अंतिम सामना रंगला आणि संघर्षपूर्ण लढतीत मालेगावने आयएससी मालेगावचा १५-०७, १६-१४ असा पराभव केला.

## ‘आट्यापाट्या’त मुलींचा सुवर्णझेंडा

। कुडाळ । प्रतिनिधी ।

क.म.शि.प्र. मंडळ संचलित कुडाळ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने विभागीय आट्यापाट्या स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले. या संघाने कोल्हापूर, सांगली, सातारा आणि रत्नागिरी यांसारख्या दिग्गज संघांना नमवून विभागीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. हा संघ आता धाराशिव-कळंब येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे साठी पात्र ठरला आहे.विजेत्या संघात कर्णधार लावण्या गावडे, जैलेशा तेजम, जुई चव्हाण, सृष्टी शेटकर, वैदेही कर्पे, स्वरा जाधव, शालिनी दळवी, वैभवी राणे, रोशनी कदम, दुर्वा देसाई, तनया घोगळे आणि चित्राली कुंभार या



खेळाडूंचा समावेश होता. अंतिम सामन्यात लावण्या गावडे, वैभवी राणे, जैलेशा तेजम व वैदेही कर्पे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजयश्री खेचून आणली.

यशाबद्दल संस्थेचे अरविंद शिरसाट, का. आ. सामंत, आनंद वैद्य, सुरेश चव्हाण, महेंद्र गवस, विपिन वराडे, प्रवीण भोगटे, रंजन तेली, विजय मयेकर, अनिल पोवार, वैभव कोंडसकर, रामचंद्र खाकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकवर्गाने सर्वांचे अभिनंदन केले असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मंडल कार्यालय मनमाड विजेता



। पनवेल ग्रामीण। प्रतिनिधी।

भारतीय खाद्य निगम मंडल कार्यालय, पनवेल यांच्या वतीने अंतर-मंडलीय क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मंडल कार्यालय मनमाड संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तर मंडल कार्यालय पनवेल संघाने उपविजेतेपद मिळवले.

स्पर्धेचा अंतिम सामना २६ मार्च रोजी मंडल प्रबंधक, पनवेल राजेश ईश्वरदास उंदीरवाडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. यावेळी आंचलिक कार्यालय, मुंबई येथील कार्यकारी निदेशक (पश्चिम)अश्विनी कुमार गुप्ता हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

स्पर्धेचे आयोजन आर. एसपीसी. महाराष्ट्र यांच्या माध्यमातून करण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाव्यवस्थापक हरनारायण सिंह, उपमहाव्यवस्थापक गौतम कुमार आणि उपमहाव्यवस्थापक राजेश वर्मा यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेमुळे विविध मंडळांतील खेळाडूंमध्ये क्रीडास्पर्धेची भावना आणि संघभावना अधिक दृढ झाली असून, अशा उपक्रमांमुळे कर्मचारीवर्गामध्ये उत्साह व एकात्मता वाढीस लागते असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## माहीरची जलतरणात ऐतिहासिक कामगिरी

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण येथील जलतरणपटू माहीर पाटील याने धाडसाने व चिकाटीने घारापुरी बेटावरून अरबी समुद्रात उडी मारून तब्बल १२ किलोमीटर अंतर पोहून गेटवे ऑफ इंडिया गाठण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याने हे अंतर अवघ्या ४ तास ४८ मिनिटे २१ सेकंदांत पूर्ण केले. माहीरच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे उरणसह मुंबईत देखील त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

भविष्यातही अशाच प्रकारे देशाचे नाव उज्वल करण्याचा निर्धार माहीरने यावेळी व्यक्त केला आहे.

माहीरने पहाटे ५ वाजून ५ मिनिटांनी घारापुरी बेटावरून जलप्रवासास सुरुवात केला. भर समुद्रात, अंधाराच्या छायेत आणि लाटांच्या प्रचंड आव्हानांशी सामना करत त्याने आपले ध्येय गाठले. या प्रवासात समुद्रातील प्रवाह, थंड पाणी आणि अंधार अशा अनेक अडचणींचा सामना करत माहीरने अपूर्व जिद्द दाखवली. माहीरच्या या मोहिमेचे निरीक्षण विनय शहा यांनी केले.

या धाडसी मोहिमेत माहीरला संतोष पाटील, राज संतोष पाटील, साई संतोष पाटील, जयेश अशोक पाटील, मयुरेश राजेंद्र पडते आणि हितेश भोईर यांच्यासह अनेक प्रशिक्षक व पर्यवेक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. नेव्हल आर्मामेंट डेपो, महेश पाटील यांनीही सहकार्य केले. माहीरच्या या दैदीप्यमान कामगिरीमुळे त्याच्या कुटुंबासह चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्या या यशात पूजा पाटील, परेश पाटील, मंदा पाटील, प्रसाद पाटील, सुगंधा प्रसाद पाटील यांचा समावेश आहे.



## ऑलिम्पिकमध्ये नवीन नियम

**नवी दिल्ली:** ऑलिम्पिकच्या जागतिक व्यासपीठावर जिथे प्रत्येक सेपंद, प्रत्येक क्षण आणि प्रत्येक विजयामागे वर्षानुवर्षांची मेहनत असते, तिथे आता एक मोठा आणि भावनिक वाद पेटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने घेतलेल्या निर्णयानुसार २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकपासून तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) महिलांना महिला गटात खेळण्यास बंदी घालण्यात येणार आहे. खेळांमधील समानता आणि संधी यांचा समतोल राखण्याच्या नावाखाली घेतलेल्या या निर्णयामुळे अनेक खेळाडूंची स्वप्ने, ओळख आणि संघर्ष नव्या वळणावर येणार आहेत. एकीकडे न्याय्य स्पर्धेचा मुद्दा जोर धरतोय, तर दुसरीकडे समावेशकता आणि मानवाधिकारांचा प्रश्न उभा राहत आहे. त्यामुळे २०२८ पर्यंत हा वाद आणखी पेटण्याची चिन्हे दिसत आहेत.

---

### चौथ्या विजेतेपदासाठी भाग्यश्री फंड उत्सुक | ४२ जिल्ह्यांतील ४00हून खेळाडूंचा सहभाग

# महिलांची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

। पुणे । प्रतिनिधी ।

सोलापूर येथे २८ आणि २९ मार्च रोजी चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. निर्झरा केअर फाऊंडेशन, सोलापूर या संस्थेकडे स्पर्धेचे संयोजनपद देण्यात आले आहे. या स्पर्धेत ४२ जिल्ह्यांच्या संघांचे ४००हून अधिक खेळाडू सहभागी होणार असून महिला महाराष्ट्र केसरी किताबासाठी भाग्यश्री फंड ही प्रमुख दावेदार आहे. यापूर्वी तिने तीन वेळा हा किताब जिंकला होता.

निर्झरा केअर फाऊंडेशनच्या संचालिका आणि संस्थापक स्वाती साखरे, केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, संघाचे सरचिटणीस योगेश दोडके यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



> “पुरुषांच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची दरवर्षी महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात मोठी उत्सुकता असते. तशीच महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धासुद्धा आपली छाप पाडते आहे. वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्वाती साखरे यांनी निर्झरा केअर फाऊंडेशनच्या माध्यमातून चौथी महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित केली आहे.
> – मुरलीधर मोहोळ,राज्यमंत्री”

स्पर्धा सोलापूर जिल्ह्यातील सिद्धेश्वर पेठ परिसरात असलेल्या हरीभाई देवकरण प्रशाला व महाविद्यालयाच्या मैदानावर सुरु आहे. या स्पर्धेसाठी ५० किलो, ५३ किलो, ५५ किलो, ५७ किलो, ५९ किलो, ६२ किलो, ६५ किलो, ६८ किलो, ७२ किलो तसेच महाराष्ट्र केसरी गट (६५ ते ७६ किलो) असे वजनी गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके दिली जाणार असून महाराष्ट्र केसरी किताब जिंकणाऱ्या महिला कुस्ती केलेला मानाची गदा देऊन गौरविण्यात येणार आहे.

तीन वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या भाग्यश्री हिच्यापुढे अमृता पुजारी, प्रगती गायकवाड, अंकिता फटाले, वेदांतिका पवार यांचे आव्हान असणार आहे. भाग्यश्रीने स्पेनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या २० वर्षांखालील गटाच्या जागतिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते. तसेच थायलंडमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. गतवेळच्या महाराष्ट्र केसरी जेतेपदाच्या लढतीत भाग्यश्रीने अमृताला पराभूत करीत विजेतेपद मिळवले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुला९बा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)